


दै. राज्य **लोकतंत्र**

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–८७ | बुधवार दि.१७ जुलै २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये


# महाराष्ट्रात ८७ टक्क्यांवर खरीप पेरण्या पूर्ण

## » कृषी विभागाची पीक पेरणी अहवालातून माहिती

**पुणे । प्रतिनिधी**

**राज्यातील बहुतांश शेतकऱ्यांच्या आता खरीप पेरण्या पूर्ण झाल्या आहेत. कृषी विभागाने दिलेल्या पीक पेरणी अहवालानुसार महाराष्टात ८६.९० टक्के पेरण्या पूर्ण झाल्या असून १२३ लाख ४१ हजार ५१७ हेक्टरवर या पेरण्या झाल्या आहेत. मागील वर्षी पावसाचा खंड पडल्यामुळे आणि त्यानंतर झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते. दरम्यान, यंदा जुन महिन्यात चांगला पाऊस झाल्याने आता खरीप पेरण्या जवळपास पूर्ण झाल्याचे चित्र आहे.**

### सोयाबीनची पेरणी ११५ टक्यावर

*मागील पाच वर्षांच्या पेरण्यांच्या तुलनेत यंदा महाराष्ट्रात तब्बल ११५ टक्के पेरणी झाली आहे. गेल्या वर्षीचे सोयाबीन अजूनही हमीभावाच्या प्रतीक्षेत असताना राज्यातील शेतकऱ्यांनी पुन्हा सोयाबीन पिकावर विश्वास दाखवला असून ११५ टक्के पेरणी केली आहे. ४७ लाख ७० हजार ४९ हेक्टरवर सोयाबीनची पेरणी यंदा झाली आहे.*

मागील वर्षी सरासरीपेक्षा कमी पाऊस झाल्याने खरिपातील पीके धोक्यात आली होती. दरम्यान पावसाच्या खंडामुळे तसेच त्यानंतर झालेल्या अतिवृष्टीमुळे मराठवाड्यातील बहुतांश भागात पिकांनी माना टाकल्या होत्या. मात्र यंदा राज्यभरात सध्या पावसाचा जोर वाढला असून खरीप पेरण्या बहुतांश ठिकाणी झाल्याचे चित्र आहे. राज्यातील शेतकऱ्यांनी ८ लाख ९१ हजार



४५६ हेक्टरावर यंदा कापूस पेरणी केली आहे. नागपूर विभागात ९६ टक्के क्षेत्रावर

### कोणत्या विभागात किती टक्के पेरणी

| विभाग | पेरणी |
|---|---|
| कोकण | ३४% |
| नाशिक | ८४.१४% |
| पुणे | १०९.४१% |
| कोल्हापूर | १०३.०४% |
| छ. संभाजीनगर | ९३.५०% |
| लातूर | ९४.३८% |
| अमरावती | ९१.०८% |
| नागपूर | ५७.७०% |

कापूस पेरला असून कोल्हापूर व पुणे विभागात ◀◀ पान २ वर



### सर्वोच्च न्यायालयात दोन नव्या न्यायमूर्तींची नियुक्ती

नवी दिल्लीः सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून दोन नव्या न्यायमूर्तींची नियुक्ती मंगळवारी (दि.१६) करण्यात आली. राष्ट्रपतींनी एन. कोटीश्वर सिंह आणि आर. महादेवन यांच्या नियुक्तीला मंजुरी दिल्यानंतर सरकारतर्फे घोषणा करण्यात आली. कायदा मंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी 'एक्स'वर पोस्ट करुन या नियुक्तीबद्दल माहिती दिली.

सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड दोन नव्या न्यायमूर्तींना शपथ देतील. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांची संख्या ३४ होईल. न्यायामूर्ती एन. कोटीश्वर ◀◀ पान २ वर

# महायुतीची एक खेळी बीड जिल्ह्यात जरांगे फॅक्टरला रोखणार?

## » मुस्लिम समाजाला सोबत घेण्यासाठी अजित पवार गटाकडून उमेदवारी?







**बीड । विशेष प्रतिनिधी**

**लोकसभा निवडणुकीमध्ये जे घडलं तेच विधानसभा निवडणुकीत घडते की काय याची भीती महायुतीच्या नेत्यांना आहे. बीड लोकसभा निवडणुकीतही मराठा समाजाने मुस्लिम समाजाच्या पाठिंब्यावर पंकजा मुंडे यांचा पराभव केला. विधानसभा निवडणुकीतही मुस्लिम समाज महाविकास आघाडीच्या बाजूनेच मतदान करेल असे म्हटले जात आहे. अशा परिस्थितीमध्ये बीड विधानसभा मतदारसंघात महायुती वेगळी खेळी खेळणार असल्याची चर्चा असून मुस्लिम उमेदवार देऊन जरांगे फॅक्टरला बीड जिल्ह्यातील सर्वच विधानसभा मतदार संघात रोखण्याचे काम केले जाऊ शकते, असे म्हटले जात आहे.**

लोकसभा निवडणुकीमध्ये मराठा समाजासह मुस्लिम समाजाने महाविकास आघाडीला मते दिली. त्यामुळे गेल्या वेळेच्या अर्ध्या जागा सुद्धा महायुतीला मिळवता आल्या नाहीत. मुस्लिम च्या पाठिंबावर महायुतीला मराठा समाजाने धूळ चारण्याचे काम केले. ही परिस्थिती बदलावी यासाठी महायुतीकडून जोरदार प्रयत्न करण्यात येत आहेत मात्र अजून तरी त्यांना यामध्ये यश आलेले नाही. बीड जिल्ह्यापुरता विचार करायचा म्हटलं तर लोकसभा निवडणुकीत पंकजा मुंडे यांचा पराभव बजरंग सोनवणे यांनी केला. मराठा समाज पूर्णतः पंकजा मुंडे यांच्या विरोधामध्ये असल्याचा दिसून आलं. तर मुस्लिम समाजाने मराठा समाजाला साथ देत महाविकास आघाडीच्या उमेदवाराला मते दिली. त्यामुळे बजरंग सोनवणे यांना खासदारकीची लॉटरी लागली. लोकसभेला जे घडलं तेच विधानसभा निवडणुकीत घडतं की काय अशी भीती बीड जिल्ह्यातील महायुतीच्या नेत्यांना आहे. कारण मनोज रंगे पाटील यांनी नुकतीच शांतता रॅली बीडमध्ये काढली आणि त्याला मराठा समाजाने शंभर टक्के पाठिंबा दिलेला आहे. बीड जिल्ह्यातील महायुतीचे सर्व ◀◀ पान २ वर

### " सय्यद सलिम यांच्यानंतर मुस्लिम समाजाला नामी संधी

शेख तय्यब हे जेष्ठ संपादक असून सर्वच समाजात त्यांना मानणारा वर्ग आहे. शिवाय मुस्लिम समाजात ते आजातशत्रू आहेत. तसेच पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या मर्जीतील असून माजी आ. सय्यद सलिम यांच्यानंतर बीडचा आमदार मुस्लिम समाजाचा झालेल्या नाही त्यामुळे शेख तय्यब यांच्या रूपाने आपल्या समाजाचा आमदार करण्याची मुस्लिम समाजाला ही नामी संधी चालून आलेली आहे. बीड विधानसभा मतदार संघात महायुतीकडून मुस्लिम उमेदवार असल्यावर ओबीसी समाज डोळे झाकून त्यास मतदान करणार असल्याचे बोलले जात आहे.





# राज्यातील शेतकऱ्यांना ३ लाखापर्यंत सरसकट कर्जमाफी द्या

## अब्दुल सत्तार यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्याच्या शेजारी असणाऱ्या तेलंगणा राज्याने शेतकऱ्यांची कर्जमाफी केली. त्यानंतर राज्यातील शेतकरी, विविध शेतकरी संघटना आणि विरोधकांकडून शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची मागणी केली जात आहे. मात्र यावर राज्य सरकार असो किंवा केंद्र सरकार यांच्याकडून कोणतीच प्रतिक्रिया येताना दिसत नाही. याचदरम्यान राज्याचे पणन मंत्री अब्दुल सत्तार यांनी कर्जमाफीवरून वक्तव्य केले आहे. सत्तार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे राज्यातील शेतकऱ्यांची कर्जमाफी करावी, अशी मागणी मंगळवारी (दि.१६) केली आहे.

सत्तार यांनी एका खासगी वृत्तवाहिनीवर बोलताना शेतकऱ्यांची कर्जमाफीचा मुद्दा मांडला. सत्तार यांनी यावेळी राज्यातील शेतकऱ्यांची ३ लाखापर्यंत सरसकट कर्जमाफी सरकारने करावी अशी मागणी केली. ◀◀ पान २ वर

### तेलंगणात ४० लाख शेतकऱ्यांची कर्जमाफी

लोकसभा निवडणुकीपूर्वी तेलंगणातील काँग्रेस सरकारने शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचे आश्वासन दिले होते. त्याप्रमाणे मुख्यमंत्री रेवंथ रेड्डी यांनी राज्यातील शेतकऱ्यांच्या कर्जमाफीला आश्वासना प्रमाणे मंजुरी देली. मुख्यमंत्री रेड्डी यांनी ३१ हजार कोटींच्या शेती कर्जमाफीला मंजुरी दिली. या घोषणेमुळे राज्यातील तब्बल ४० लाख शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. तर राज्यातील २ शेतकऱ्यांचे लाखांपर्यंतचे कर्ज १५ ऑगस्टपूर्वी माफ करण्यात येणार आहे.

# गुजरातेत चांदिपुरा विषाणूचा प्रादुर्भाव!

## ६ मुलांचा मृत्यू

**अहमदाबाद । वृतसंस्था**

**गुजरातेत चांदिपुरा विषाणूची लागण होऊन गेल्या ५ दिवसांत ६ मुलांचा मृत्यू झाला आहे. आतापर्यंत राज्यातील १२ मुलांना या विषाणूची लागण झाली आहे. हा विषाणू फक्त ९ ते १४ वर्षे वयोगटातील मुलांना संक्रमित करतो.**

गुजरातचे आरोग्यमंत्री हृषीकेश पटेल यांनी आरोग्य विभागाला अलर्टवर राहण्याचे निर्देश दिले आहेत. देशातील बाधित १२ मुलांपैकी ४ साबरकांठा, ३ अरवली, १ महिसागर, १ खेडा आणि २ राजस्थान, तर १ मुलगा मध्य प्रदेशातील आहे. सर्व मुलांवर गुजरातमधील वेगवेगळ्या रुग्णालयांतून उपचार सुरू आहेत. चांदिपुरा व्हायरसमुळे मुलांमध्ये ताप आणि फ्लूसारखी लक्षणे दिसतात. आजार बळावल्यास मेंदूला सूज येऊ शकते आणि त्यामुळे मृत्यू होऊ शकतो. हा विषाणू फ्लेबोटोमाईन माशी, गोचिड, एडिस डासांच्या माध्यमातून पसरतो. हा विषाणू संसर्गजन्य नाही. रुग्ण आढळलेल्या परिसरातील ४ हजार ४८७ घरांतून आवश्यक ती स्वच्छता करण्यात आली आहे. सध्या या विषाणूवर कोणताही इलाज सापडलेला नाही.

# राष्ट्रवादी कोणाची : पुढील सुनावणी सहा ऑगस्टला

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष नाव आणि चिन्ह तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे नागालँडमधील आमदार अपात्रता प्रकरण हे दोन्ही प्रकरणे सर्वोच्च न्यायालयात एकत्र करण्यात आली होती. हे प्रकरण मंगळवारी सुनावणीला होते. मात्र, वेळेअभावी ते सुनावणीपर्यंत येऊ शकले नाही. दरम्यान, शरद पवार गटाचे वकील अभिषेक मनू सिंघवी यांनी हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयासमोर पुन्हा नमूद केले. आता या याचिकेवर पुढील सुनावणी ६ ऑगस्टला होणार आहे.**

शरद पवार गटाचे वकील अभिषेक मनू सिंघवी यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष नाव आणि चिन्ह तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे नागालँडमधील आमदार अपात्रता हे एकत्र केलेले प्रकरण सर्वोच्च न्यायालयासमोर नमुद केले होते. अभिषेक मनू सिंघवी यांनी न्यायालयाला सांगितले की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष नाव आणि



चिन्ह प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने १९ मार्चला अजित पवार गटाला नोटीस जारी केली होती आणि त्यांचे उत्तर चार आठवड्यात दाखल करण्यास सांगितले होते, या गोष्टीला आता जवळपास चार महिने उलटून गेले. मात्र, अजित पवार गटाने अद्याप उत्तर दाखल केले नाही. त्यावर न्यायालयाने तातडीने अजित पवारांना दोन आठवड्यांच्या आत उत्तर दाखल करण्याचे आदेश दिले. आणि जर शरद पवारांना अजित पवारांच्या उत्तराला रिजॉईंडर द्यायचे असेल, तर एका आठवड्यात ◀◀ पान २ वर

### बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१६ जुलै २०२४**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : ६.०० क्विंटल | २,२०० | २,४०० | २,२९७ |
| ज्वारी/हायब्रिड : ५४.०० क्विंटल | २,११५ | २,९७० | २,३५९ |
| मूग : १.०० क्विंटल | १,९५० | ३,०४१ | २,४५५ |
| तूर : ०.५० क्विंटल | ८,८०१ | ८,८०१ | ८,८०१ |
| उडीद : ०.५० क्विंटल | ४,००१ | ४,००१ | ४,००१ |
| बाजरी: ४२.०० क्विंटल | २,४४० | ३,२५५ | २,७२१ |
| चिंच/लोकल: २०.०० क्विंटल | १,१०० | ३,५५० | २,३२५ |
| सोयाबीन: १५.५० क्विंटल | ४,४५० | ४,४५० | ४,४५० |
| हरभरा: ४.०० क्विंटल | ६,३७६ | ६,५०१ | ६,४२४ |

# धनंजय मुंडेंच्या जन्मदिनानिमित्त परळीत आयोजित महामॅरेथॉन स्पर्धेत भर पावसात धावले परळीकर

## महाराष्ट्रासह कर्नाटक, हरियाणा येथील स्पर्धकांनीही घेतला सहभाग





**परळी वैद्यनाथ । प्रतिनिधी**

**राज्याचे कृषीमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या १५ जुलै ता जन्मदिनाचे औचित्य साधून राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या महामॅरेथॉन स्पर्धेत परळीकरांनी अक्षरशः पडत्या पावसात मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला.**

परळीसह बीड जिल्ह्यातुन तसेच कोल्हापूर, सांगली, जालना, नांदेड, नंदूरबार एवढेच नाही तर कर्नाटक आणि हरियाणा राज्यातून देखील शेकडो स्पर्धक 'ग्रीन परळी–क्लीन परळी' हा संदेश देत या स्पर्धेत सहभागी झाले होते.

**खुला गट** : प्रथम–अभिषेक कामन्ना देवकते (कोल्हापूर), द्वितीय–अभिनंदन दिपक सूर्यवंशी (सांगली), तृतीय–अरुण धनसिंग राठोड, ज्येष्ठ नागरिक गट, प्रथम–रविंद्र सूर्यभान ◀◀ पान २ वर

### भर पावसात उत्साहात स्पर्धा पार पडली

डी.जे.च्या तालावर देशभक्तीपर गीते आणि प्रेरणादायी गीतांवर स्पर्धेकांनी ठेका धरला. ज्येष्ठ नागरिक गटातील विजेत्या स्पर्धेकांच्या हाताने ना.धनंजय मुंडे यांचा वाढदिवसाचा केक कापला गेला, हरीत परळी... स्वच्छ परळी हा संदेश देण्याच्या उद्देशाने स्पर्धा आयोजित केली गेली होती...सहभागी प्रत्येकाला वृक्ष व प्रविण्य प्रमाणपत्र देण्यात आले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी व सहकारी आणि परळी तालुका शारीरिक शिक्षक संघटनेचे अध्यक्ष एस.पी. मुंडे सर व सर्व क्रीडा शिक्षक यांनी परिश्रम घेतले.

## अग्रलेख

# स्वत:चेच शब्द सरकारच्या अंगलट !

मराठा-ओबीसी आरक्षण विषयावर राज्य सरकारच्या बैठकीला विरोधकांना येण्यापासून शरद पवार यांनी रोखले अशी टीका केली त्या छगन भुजबळ यांना रात्रीत उपरती झाली. सकाळी उठून त्यांनी थेट सिल्वर ओक बंगला गाठला आणि शरद पवार यांना मराठा आणि ओबीसींच्या हितासाठी सक्रिय होण्याचे आवाहन केले. रविवारच्या बारामतीच्या सभेत भुजबळांना मोठेपणा देत राष्ट्रवादीने अजित पवारांच्या नंतर शेवटचे भाषण भुजबळांचे ठेवले. तरीही त्यांनी सकाळी केलेल्या या कृतीने महाराष्ट्रभर खळबळ माजली. अजित पवार फुटून गेले तेव्हा तिकडे काय चालले बघून येतो असे सांगून गेलेले भुजबळ अचानक पवारांना तिथला संदेश देण्यासाठी परतले की काय? असे वाटून गेले. पत्रकार परिषदेत ते जे बोलले त्यावरून राज्यातील आरक्षण प्रश्न सर्वशक्तिमान राज्य सरकार सोडवू शकत नाही. शरद पवार मात्र सोडवू शकतात असे भुजबळ यांना वाटते आहे, हे स्पष्ट झाले.

शरद पवारांनी ओबीसींना आरक्षण दिले आणि मराठवाड्यातील नामांतराचा प्रश्न परिणामांची तमा न बाळगता सोडवला याची आठवण भुजबळांनी पवारांना या भेटीत करून दिली. आयुष्यातील प्रदिर्घकाळ ज्यांना पवार सोबत घेऊन चालले त्या भुजबळांनी रविवारी केलेली टीका ते सोमवारी सकाळपर्यंत विसरतील अशी आपणच मनाची समजूत घालू. त्याचमुळे आमदार मिलिंद नार्वेकर यांना लगेच भेटलेले पवार भुजबळांच्या विना अपॉइंटमेंट येण्यापूर्वी झोपी गेले आणि दीड तासांनी जागे होताच भेटले. त्यानंतरच्या चर्चेत पवारांनी मुख्यमंत्री आणि जरांगे यांच्या भेटीत काय ठरले ते आपल्याला माहिती नाही, लक्ष्मण हाके यांचे उपोषण सोडवताना तुम्ही त्यांना काय शब्द दिले हेही आपल्याला माहीत नाही शिवाय सरकारने ५० लोकांची बैठक बोलावली तर अशा संवेदनशील विषयावर गावगर्दी करून निर्णय होऊ शकत नसतात. त्यापेक्षा आपण मुख्यमंत्र्यांशी बोलू आणि ज्या काही चार-सहा लोकांना बोलवावे लागेल त्यांना बोलून किंवा मुख्यमंत्री बोलवतील तेथे जाऊन या विषयावर चर्चा करण्यास आपण तयार असल्याची भूमिका सांगितली. ती पत्रकार परिषद घेऊन भुजबळांनी जाहीर केली. या दरम्यान भुजबळांनी केलेले सगळे खुलासे ते या प्रकरणात पुरते अडकल्याची साक्ष देणारे आहेत. वास्तविक मराठा आणि ओबीसी आरक्षण हा अत्यंत संवेदनशील विषय आहे. यावर शेंडगे वगैरे बुड नसणाऱ्यांनी बोलणे आणि भुजबळांनी बोलणे यात खूप अंतर आहे. आपण राज्याचे ज्येष्ठ मंत्री आहोत आणि ओबीसी नेत्यांमध्ये देशात सर्वात ज्येष्ठ आहोत हे विसरून लोकसभा निवडणुकीपूर्वी भुजबळ ज्या जोशात बोलले त्यामुळे जरांगे सारख्या नवख्या नेत्यांनी आधी इशारा दिला मग पानउतारा केला. त्यामुळे महाराष्ट्राला तो चुपचाप सहन करावा लागला. भुजबळ यांनी आपली थोरवी सोडली आणि मग त्यांचा वापर सर्वांनी आपला हेतू साध्य करण्यासाठी करून घेतला. रविवारी बारामतीत त्याचा कडेलोट झाला. जेव्हा हे लक्षात आले तेव्हा ते पवारांशी बोलायला गेले. अजून ते राहुल गांधी आणि पंतप्रधानांशी सुद्धा बोलायचे म्हणत आहेत. पण, एकदा महत्त्व गमावले की ज्येष्ठत्वही राहत नाही हे ते विसरले असावेत. आता राज्यात मराठा किंवा ओबीसींचा काही निर्णय घ्यायचा असेल तर मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मराठा नेतृत्व म्हणून जरांगे पाटील, ओबीसींचे नेते म्हणून लक्ष्मण हाके अशांशी चर्चा करतील, भुजबळांशी नाही. कदाचित आपला सहभाग त्यात असावा म्हणून पुन्हा भुजबळ काही उलटसुलट वागतील तर तो त्यांना मोठा फटकाही ठरु शकेल. पवारांनी भुजबळांना जो शब्द दिला आहे त्यानुसार ते कदाचित मुख्यमंत्र्यांकडेच जाऊन बसतील. राज्यातील ठराविक नेत्यांना बोलावूनही घेतील. पण, आता सरकारवर दबाव वाढणार आहे. भुजबळ यांना आता मराठा आणि ओबीसीमध्ये पेटलेले सामाजिक वास्तव दिसते. पण ते शांत ठेवण्याची जबाबदारी सरकारने पार पाडावी हा पवारांचा भविष्यातील शब्द सरकारला शिवधनुष्य छातीवर पडल्याप्रमाणे संकटाचा ठरणार आहे. आरक्षणाच्या मांडवात सरकारला मिरवायचे होते. पण सरकार नावाच्या लग्न घरात एकमत नसल्याने आणि घरातल्या प्रत्येकाने आपणच वधू पिता समजून शब्द दिल्याने हे सगळे शब्द पूर्ण करणे सरकारच्या अंगलट आले आहेत. विधानसभेचा मुहूर्त जवळ आला आहे. नेमक्या अक्षता पडायच्या वेळी संकटे उभी राहिली आहेत. आता विरोधकांनी आपली भूमिका स्पष्ट करावी, त्यांनी बैठकीला यावे, विरोधकांनी आपले म्हणणे लेखी द्यावे असला सगळा पोरकटपणा सरकारकडून करून झालेला आहे. भर सभागृहात पवारांना मराठ्यांचे शत्रू भासवणारी भाषणेही सत्ता पक्षाकडून झाली आहेत. इतके करून पुरले नाही म्हणून बारामतीला जाऊन आरोप केला आहे. त्याच्या बातम्या छापलेल्या वर्तमानपत्राची शाई वाळण्यापूर्वी भुजबळांच्या नव्या बातमीची प्रेस कॉपी तयार झाली. सरकार नावाच्या यंत्रणेची ही धरसोड वृत्ती आणि त्यातील ज्येष्ठ मंत्री असलेल्या भुजबळांचे असे उलटसुलट वर्तन त्यांना भविष्यात तोटा वाढवणारे ठरणार आहे. २४ तास निवडणूक मोडवर काम करण्याच्या नादात सरकारने स्वत:वर आफत ओढवून घेतली आहेच. पण, राज्यातील सामाजिक वातावरणही गढूळ केले आहे. मराठा आणि ओबीसी ही शक्ती हातात हात घालून चालली पाहिजे होती, परिस्थिती सामान्य ठेवून त्यांचे प्रश्न मार्गी लावणे शक्य होते. तिथे राजकीय तेढ वाढवली गेली. आता हाताबाहेर गेलेले हे प्रकरण दुसऱ्या कुणीतरी सावरावे असे म्हणणे चुकीचे आहे.

# श्रीमंत मराठ्यांचा गरीब मराठ्यांना आरक्षण न देण्याचा डाव-जरांगे पाटील

**जालना । प्रतिनिधी**

**मराठा समाजातील श्रीमंत घटक गरीब मराठ्यांना आरक्षण मिळू नये असा डाव रचत आहेत, असा आरोप मराठा आरक्षण आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे. त्यांच्या मते, गरीब मराठ्यांचे हित साधणे ही श्रीमंत मराठ्यांच्या राजकारणात आणि सत्ता धारणेत कधीच प्राथमिकता नव्हती. मराठा आणि कुणबी या दोन समाजांमध्ये फरक नाही आणि मराठा समाजाने ओबीसी आरक्षणासाठी हक्काचा लढा द्यावा, असे देखील जरांगे म्हणाले.**



मनोज जरांगे पाटील यांच्या मते, गरीब मराठ्यांच्या अधिकारांसाठी हा लढा आहे. त्यांनी असेही म्हटले की, कोणत्याही राजकीय नेत्यांना गेल्या ७० वर्षांत गरीब मराठ्यांच्या मुलांना मोठे करण्याची इच्छा नव्हती. श्रीमंत मराठ्यांनी नेहमीच आपल्याच फायद्यासाठी काम केले आहे त्यांनी गरीब मराठ्यांचे हित साधण्याचा प्रयत्न कधीच केला नाही. मनोज जरांगे पाटील यांनी प्रकाश आंबेडकर यांच्या आरक्षण बचाव यात्रेबद्दल आपले मत व्यक्त केले. त्यांनी म्हटले की, त्यांनी यात्रा काढावी की नाही हा त्यांच्या प्रश्न आहे. मात्र, गरीब मराठ्यांना ओबीसीतून आरक्षण मिळवण्यासाठी आपला निर्धार दृढ आहे. जरांगे पाटील यांनी प्रकाश आंबेडकर यांच्याकडून सगळ्या जाती-धर्मांची बाजू मांडण्याची अपेक्षा व्यक्त केली. त्यांनी सांगितले की, आंबेडकर यांच्या लोकांमध्ये असलेल्या विश्वासार्हतेला धक्का लागू नये आणि ते नेहमीच सत्य बोलतात हे सिद्ध व्हावे. जरांगे पाटील यांनी अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा आदर व्यक्त केला आणि म्हटले की, काय बोलायचे हा प्रत्येकाचा स्वतःचा निर्णय आहे. मात्र, त्यांनी आशा व्यक्त केली की प्रकाश आंबेडकर सगळीकडून सारखी मांडणी करतील आणि समाजाच्या सर्व घटकांच्या हिताचे विचार करतील.

# महा-ई-सेवा केंद्रात होतेय 'लाडक्या बहिणी'ची आर्थिक लूट

सोलापूर : मुख्यमंत्री यांनी जाहीर केलेल्या 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेचे ऑनलाईन अर्ज भरताना नारीशक्ती ॲपवर महिलांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. शेवटच्या टप्प्यामध्ये फोटो अपलोड केल्यावर फोटो अपलोड न होता ॲपमधून थेट बाहेर पडतो. वैतागलेल्या महिला महा-ई-सेवा केंद्राचा आधार अर्ज भरण्यासाठी घेत आहेत. याठिकाणी मुख्यमंत्र्यांच्या 'लाडक्या बहिणी'ची सरासरी लूट केली जात आहे. एक अर्ज दाखल करण्यासाठी १०० ते १५० रुपये घेत असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. राज्य शासनाने जाहीर केलेल्या 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेचे अर्ज नारीशक्ती ॲपवर भरताना ॲप लवकर ओपन होत नाही. सर्व्हर डाऊन असते. कागदपत्रे अपलोड करण्यास वेळ लागत आहे. अनेक वेळा प्रयत्न करुन अर्ज सबमिट होत नाही. शेवट्या टप्प्यात ऑनलाईन फोटो दाखल केल्यानंतर ॲपमधून बाहेर फेकला जातो. पुन्हा पहिल्यापासून माहिती भरावी लागत आहे.

# पंढरपुरात वारी काळात बासुंदी उत्पादन अन् विक्री बंदी; तगडा पोलिस बंदोबस्तही

**पंढरपूर । प्रतिनिधी**

**आषाढी वारीसाठी यंदा महाराष्ट्रासह परराज्यातून सुमारे १५ लाखांहून अधिक वारकरी पंढरपुरात दाखल होण्याची शक्यता आहे. त्यामुळे येथे चोख पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. यादरम्यान अन्न व औषध प्रशासन विभागास खबरदारी घेण्याच्या सूचना जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिल्या आहेत. त्याप्रमाणे पंढरपुरात बासुंदी उत्पादनासह विक्रीवर अन्न व औषध प्रशासन विभागाने बंदी घातली आहे.**

पंढरपूर येथे आषाढी वारीचा सोहळा सुरू असून लाखो वारकरी पंढरपुरात दाखल झाले आहेत. या कालावधीत खाद्य पदार्थातून विष बाधा होऊ नये याची काळजी अन्न व औषध प्रशासन विभागाकडून घेतली जात आहे. यासाठी जिल्हाधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे येथील सर्व दूध व दुधजन्य पदार्थ उत्पादक, विक्रेत्यांना सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच आषाढी वारी कालावधीत बासुंदी उत्पादन करू नये, बासुंदीची विक्री आणि साठा करू नये, अशा सूचना देखील दुकानदार आणि हॉटेल मालकांना देण्यात आल्या आहेत. तसेच वारीत पंढरपूरमध्ये येणाऱ्या भाविक आणि वारकऱ्यांना तयार भगर पीठ खरेदी करू नये. कोणी भगर पीठ खरेदी केलेच तर ते योग्यरीत्या शिजवूनच खावे असेही आवाहन अन्न व औषध प्रशासनाने केले आहे.



### तगडा पोलिस बंदोबस्त

आषाढी वारीचा मुख्य सोहळा बुधवारी होत असून पंढरपुरात १५ लाखांपेक्षा अधिक वारकरी येण्याची शक्यता आहे. त्यामुळे येथे तब्बल ११ हजार पोलिसांचा बंदोबस्त नेमण्यात आला आहे. पोलिस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांच्या नेतृत्वाखाली चार अप्पर पोलिस अधीक्षक, २५ उपअधीक्षक आणि ३१७ अधिकारी पंढरीच्या सुरक्षेसाठी दाखल झाले आहेत. तर वारीत १५४ सीसीटीव्हींची नजर असणार आहे.

## पान १वरून...

### महाराष्ट्रात ८७

१३ ते२० टक्के अधिक कापूस पेरणी झाली आहे. तर राज्यात यंदा खरीप ज्वारीची ३१.२% वर पेरणी झाली असून ९० हजार १८८ हेक्टरवर शेतकऱ्यांनी खरीप ज्वारीचे पीक घेतले आहे. कोल्हापूरसह नाशिक विभागात खरीप ज्वारीची पेरणी अधिक झाली असून इतर विभागात तुलनेने कमी पेरणी झाल्याचे अहवालात नोंदवले आहे.

---------

### महायुतीची एक खेळी बीड जिल्ह्यात

उमेदवार पाडण्याचे एक प्रकारे संकेतच मनोज जरांगे पाटील यांनी दिलेले आहेत. त्यामुळे सहा विधानसभा मतदारसंघांमध्ये महायुतीच्या सर्वच उमेदवारांना ही निवडणूक जड जाणार आहे. यातच एक महायुती साठी आशेचा किरण आहे. जरांगे फॅक्टरला टक्कर द्यायची असेल तर ओबीसीच्या जोडीला मागासवर्गीय समाज किंवा मुस्लिम समाज असेल तरच ते शक्य होऊ शकेल. मागासवर्गीय समाज काही प्रमाणामध्ये महायुतीच्या सोबत राहू शकतो पण एक गट्टा मते महायुतीला पडणे अशक्य असल्याचे म्हटले जात आहे. त्यामुळे मुस्लिम समाजाचा दुसरा पर्याय महायुतीच्या समोर असेल. मुस्लिम समाजाने ठरवलं तर बीड जिल्ह्यातील सहा विधानसभा मतदारसंघांमध्ये एक गठ्ठा मतदान ते टाकू शकतात याचा अनुभव लोकसभा निवडणुकीमध्ये आलेला आहे. त्यासाठी बीड विधानसभा मतदारसंघात वेगळा प्रयोग महायुतीला करावा लागणार आहे. लोकसभा निवडणुकीमध्ये मुस्लिम समाजाने मराठा उमेदवारांना मतदान केलं मात्र संभाजीनगरमध्ये इम्तियाज जलील यांना मराठा समाजाने मतदान केलं नाही ही बाब समोर आलेली आहे. याबद्दल इम्तियाज जलील यांनी सुद्धा नाराजी व्यक्त करून मुस्लिम समाजाची मते चालतात मात्र मुस्लिम समाजाचा उमेदवार चालत नाही असे सांगून मराठा समाजावर हल्लाबोल केला होता. त्यामुळे कुठेतरी मराठा समाजावर मुस्लिम समाज नाराज असल्याचे दिसत असून जर महायुतीने बीड विधानसभा मतदारसंघात मुस्लिम समाजाचा उमेदवार दिला तर त्याचा फायदा जिल्ह्यातील सर्वच विधानसभा मतदारसंघात होऊ शकतो. त्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने बीड विधानसभेची जागा आपल्याकडे घ्यावी लागेल. सध्या बीड येथील ज्येष्ठ संपादक शेख तय्यब यांचे नाव बीड विधानसभा मतदारसंघात मुस्लिम समाजाकडून आघाडीवर आहे. जर त्यांना अजित पवार गटाने उमेदवारी दिली तर त्याचा फायदा सर्वच विधानसभा मतदारसंघांमध्ये होऊ शकतो. महाविकास आघाडी बीडची जागा आ. संदिप क्षीरसागरांमुळे मुस्लिम समाजाला सोडू शकत नाही, अशा वेळी महायुतीने उमेदवारी दिली तर जिल्ह्यातील राजकीय समिकरण बदलण्यास वेळ लागणार नाही. कारण मुस्लिम समाजाच्या पाठिंब्याशिवाय जरांगे फॅक्टर प्रभावी ठरु शकत नाही, हे लोकसभेला दिसून आले आहे. अशावेळी ओबीसी समाज आणि मुस्लिम समाजाची मते जर एक गट्टा पडली तर बीड जिल्ह्यातील सहा विधानसभा मतदारसंघांमध्ये महायुतीचे आमदार होऊ शकतात. जरांगे फॅक्टरचा प्रभाव पाहता महायुतीच्या उमेदवारांना विधानसभेत सुद्धा मराठा समाजाची ७० ते ८० टक्के मते पडणार नाहीत असा अंदाज आहे. त्यामुळे मुस्लिम समाजाला बीडमधून उमेदवारी देऊन त्यांना आपल्या सोबत घेऊन वेगळी खेळी करण्याची नामी संधी महायुतीला मिळू शकते.

-----------

### सर्वोच्च न्यायालयात दोन

सिंह हे जम्मू आणि काश्मीरचे मुख्य न्यायाधीश आहेत. या नव्या नियुक्तीनंतर ते सर्वोच्च न्यायालयात नियुक्त झालेले मणिपूरचे पहिले न्यायाधीश ठरले आहेत. तर न्यायमूर्ती आर. महादेवन हे सध्या मद्रास उच्च न्यायालयाचे कार्यकारी मुख्य न्यायाधीश आहेत. दरम्यान, सर्वोच्च न्यायालयातील माजी न्यायाधीश अनिरुद्ध बोस आणि न्यायाधीश ए. एस. बोपण्णा यांच्या निवृत्तीनंतर दोन जागा रिक्त झाल्या होत्या. त्या जागांवर न्यायाधीश म्हणून ही नियुक्ती करण्यात आली आहे.

----------

### राष्ट्रवादी कोणाची

त्यांनी रिजॉईंडर दाखल करावे, असेही स्पष्ट निर्देश न्यायालयाने दिले. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये उभी फूट पडल्यानंतर शरद पवार गट आणि अजित पवार गट असे दोन गट निर्माण झाले. यानंतर दोन्ही गटांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आमचाच असा दावा केला. हा वाद पुढे निवडणूक आयोगात गेला. आयोगाने राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि पक्षाचे घड्याळ चिन्ह हे अजित पवारांकडे देण्याचा निर्णय घेतला. या निर्णयाला शरद पवार गटाने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे.

--------------

### राज्यातील शेतकऱ्यांना ३

तसेच आपण याबाबत मुख्यमंत्री शिंदे यांच्याकडे मागणी केल्याचे ते म्हणाले. शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे. यासाठी मुख्यमंत्री शिंदे यांनी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांच्याशी बोलावं अशी, ही विनंती केल्याचे सत्तार म्हणाले. त्याचबरोबर राज्य सरकारने मोदी-शाह यांच्याशी बोलून शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी तातडीने विचार करावा. शेतकऱ्यांना ३० दिवसात कर्जमाफी द्यावी, अशीही मागणी केल्याचे सत्तार म्हणाले. तसेच या कर्जमाफीसाठी केंद्रासह राज्याने काही वाटा उचलावा. याची सध्या पडताळीणी सुरू असून तशी माहिती गोळा केली जात आहे. सरकारची यथाशक्ती, सरकारचे उत्पन्न याचा विचार करून सरकारची कर्जमाफीबाबत ही सहानुभूतीची असल्याचे मंत्री अब्दुल सत्तार म्हणाले.

----------

### धनंजय मुंडेंच्या जन्मदिनानिमित्त परळीत

पाटील (सोलापूर), द्वितीय-केशव माणिकराव मोटे (रेणापूर), तृतीय-शेख उस्मान चांद (बीड ), महिला गट , प्रथम- भारती कुमारी (हरियाणा), द्वितीय - रिंकी धन्य पांवरा (नंदुरबार), तृतीय- प्रणाली संजय शेगावकर (शेगाव), शालेय गट,, प्रथम- भावेश कुमार , द्वितीय -आवेश चव्हाण (कोल्हापूर), तृतीय-प्रणव दिलीप राठोड , उत्तेजनार्थ-बिरुदेव शहाजी कोळेकर , उत्तेजनार्थ- गोविंद स्पर्धेच्या उद्घाटन सोहळ्यास उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर,तहसीलदार व्यंकटेश मुंडे,गुन्हे शाखेचे बीड जिल्हा पोलिस निरीक्षक उस्मान शेख,राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सुजितसिंह पवार,प्रदेश उपाध्यक्ष तुळशीराम पवार, तालुकाध्यक्ष वैजनाथ सोळंके,ज्येष्ठ नेते प्रा.मधुकर आघाव, गट शिक्षण विस्तार अधिकारी अन्सारी मॅडम यांसह मान्यवर उपस्थित होते.

----------

# भूतलावरचे वैकुंठ पंढरपूर तीर्थक्षेत्र



*आषाढ महिना जवळ आला की सर्व वारकऱ्यांना वेध लागतात ते आषाढी पायीवारी दिंडी सोहळ्याचे .दिंडीमध्ये सामील होऊन भगवंताचे नामस्मरण करण्यामध्ये जो आनंद आहे तो कशातही नाही. या वेळेला शेतकऱ्यांचीशेतीची कामे जवळजवळ सर्व आटोपलेली असतात पावसाच्या आगमनाने वातावरणा मध्ये गारवा निर्माण झालेला असतो अशा रम्य वातावरणामध्ये पंढरपूरला पायी वारीमध्ये जाणे हा एक आगळा वेगळा आनंद आहे . एवढा मोठा समाज कोणाला आमंत्रण नाही कुणाला निमंत्रण नाही आणि कोणाला मानपान नाही तरीही सगळं काही एकदम शिस्तीत आणि नियमाने होतं इतक्या मोठ्या गर्दीमध्ये एकही माणूस कोणालाही नावाने हाका मारत नाही या वारीमध्ये सर्वांचे एकच नाव असते ते म्हणजे माऊली. पायी दिंडी सोहळ्यात जाणे म्हणजे आपल्यातला मी पणा आणि दंभ अहंकार काढून टाकने आणि सर्वांशी प्रेमाने भक्ती भावाने व आदराने आपले आचरण ठेवणे ही खरी वारी आहे. वारीमध्ये चालताना कोणीही उचनीच नाही मोठा नाही गरीब नाही श्रीमंत नाही सर्व एक समान आहेत आणि कुणीही आपल्यात मी पण असा देखावा करत नाहीत...*

**|| पंढरीच्या लोका नाही**
**अभिमान पाया पडे जन एकमेका ||**

खरोखरच पंढरपूरला गेल्यानंतर भगवंताला डोळे भरून पाहणे चंद्रभागेचे स्नान करणे याच्यासारखे दुसरे पुण्य नाही. पंढरपूर पायी वारी दिंडी सोहळ्यात आपल्याला काही अडचणीमुळे जाता आले नाही तरी आपण कमीत कमी वारीला जाणाऱ्या दिंडीतील वारकऱ्यांना वाट लावण्यासाठी गेलो , काही वेळ दिंडीमध्ये सामील होऊन हरिनामाचा गजर केला तरीही आपल्याला वारीचे पुण्य मिळत या आशयाचा जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराजांचा अभंग आहे

**|| पंढरीच्या लागा वाटे**
**सखा भेटे विठ्ठल ||**

दरवर्षी अशाड महिना जवळ आला की संपूर्ण वारकऱ्यांना वेध लागतात ते पंढरपूर पायी वारी सोहळ्याचे. आपली नित्य कामे बाजूला ठेवून वारकरी वारीसाठी सज्ज होतात भागवत धर्माची भगवी पताका ,पडशी आणि पंधरा दिवस लागणारे आपले कपडे औषध गोळ्या अशी पडशी भरून वारकरी वारीसाठी सज्ज होतात. पंढरपूरची वारी म्हणजे एक आनंदी सोहळा मजल दरमजल करत व मुखाने भगवान पांडुरंग परमात्म्याचे नामस्मरण करत पायी वारीची वाट चालू लागली की वारकऱ्यांना कशाचीही तमा नसते पाऊस, वारा ,ऊन ,चिखल या कुठल्याच गोष्टी त्यांच्या ध्यानीमनी येत नाही. त्यांचा ध्यास फक्त भीमा तीरावर आपले दोन्ही हात कटेवर ठेवून अखंड मानवतेचा सांभाळ करणाऱ्या भगवान पांडुरंगाला डोळे भरून पहण्यात तसेच गरुड खांबाला मिठी मारण्याचा व भगवंताच्या दरबारामध्ये लोटांगण घालण्याचा वेध लागलेला असतो. आपल्या जीवनामध्ये आपण पंढरपूरची वारी करा आणि ती नित्यनेमाने करा असे साधुसंत सांगत आलेले आहेत काही कारणांनी वारीला जाणे होत नाही प्रपंच करत असताना अनेक अडचणी येतात ,अशावेळी पाचवा वेद निर्माते जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज आपल्या अभंगांमध्ये म्हणतात

**|| पंढरीच्या लागा**
**वाटे सखा भेटे विठ्ठल ||**

आपणास आपल्या प्रपंचातील अडीअडचणीमुळे दिंडीला जाता आले नाही तरी हरकत नाही परंतु पंढरपूरला जाणाऱ्या दिंडीला किमान वाट लावण्यासाठी तरी जा. एवढ्या एका दिंडीला वाट लावण्याच्या कारणाने देखील तुमच्या जीवनामध्ये किंवा तुमच्या पदरात पुण्य पडेल .

पंढरपूर वारीत येण्याचे फलित म्हणजे आपण भगवान पांडुरंगाला शरण जावे त्याचे दर्शन घेवून प्रत्यक्ष भगवान पांडुरंग हा सर्व भक्तांचा सखा आहे जसा तो पंढरीत आहे त्यापेक्षा तो सर्वांचा मित्र सखा वआपला सोयरा आहे .दुःख दूर करणारा कनवाळू भगवान पांडुरंग परमात्मा आहे .

**|| दिनाचा सोयरा पांडुरंग ||**

दरवर्षी आषाढी वारीला पंढरपुरामध्ये असंख्य भक्त जण विठुरायाच्या दर्शनाला येत असतात आणि दर्शन बारीला लागतात या असंख्य संख्यांमध्ये सगळ्यांचेच भगवान पांडुरंगाचे दर्शन होईल हे शक्य नाही यामुळे या आषाढी वारीच्या निमित्ताने भगवान पांडुरंग देखील आपल्या भक्ताची आतुरतेने वाट पाहत असतो आपले सर्वांना दर्शन व्हावे म्हणून यावेळी या एकादशीला पांडुरंग परमात्मा राऊळावरच्या कळसावर बसलेले असतात व सर्वांना दर्शन देतात .

त्याच बरोबर कळसाच्या बाजूला असलेल्या पथाकावर देखील भगवान पांडुरंगाचे आसन स्थान असते .याचा पुरावा म्हणजेच

**|| पहता रावळाची ध्वजा**
**तेणे मुक्ती मिळती सहजा ||**

कळसाचे दर्शन झाले की आपल्याला भगवान पांडुरंग परमात्म्याचे दर्शन झाले हा आनंद प्रत्येक वारकऱ्यांच्या मनामध्ये असतो

आपल्या भक्तांना मोक्षांचा मार्ग मोकळा करण्याचे सामर्थ्य फक्त आषाढी एकादशीच्या दिवशी कळसाचे दर्शन घेणे म्हणजेच त्या भक्ताला मोक्ष देखील मिळतो महाराजांच्या प्रमाणा प्रमाणे

**|| तुका म्हणे मोक्ष देखील्या कळस ||**

भगवान पांडुरंग परमात्म्याच्या राऊळाचे व कळसाचे दर्शन झाले की त्या भक्तास प्रत्यक्ष मोक्षच मिळतो असा या अभंगाचा सरळ सरळ भावार्थ आहे

**|| सर्व तीर्थाचे तीर्थ चंद्रभागा ||**

या भूतलावर एकूण साडेतीनशे गंगा आहेत या सर्व गंगा भक्तांच्या पाप धून्याचे कार्य करतात व सर्वांना पवित्र करतात निर्मळ जळ प्यायला देतात या सर्व तीर्थांमध्ये सर्वात मोठे आणि पवित्र तीर्थक्षेत्र हे फक्त बहुतलावरील वैकुंठ असलेल्या पंढरपूर या ठिकाणी आहे या पवित्र तीर्थक्षेत्राचे नाव चंद्रभागा

या पवित्र चंद्रभागेमध्ये स्नान करणे पंढरपूर येथील चंद्रभागा येथे पवित्र स्नान केले की पुढे नामदेव पायरीचे दर्शन घ्यायचे नामदेव पायरीच्या दर्शनानंतर रांगेमध्ये भगवंताच्या रावळमध्ये गेल्यानंतर गरुड खांबाला मिठी मारणे आणि भगवंता पुढे उभे राहून आपले दोन्ही हात आणि कान पकडून आपल्याकडून झालेल्या अपराधाची क्षमा मागने व भगवंतासमोर दोन उड्या मारून परमेश्वराला विनंती करणे हे भगवंता माझ्याकडून काही चुकले असेल तर मला क्षमा असावी आणि हे फक्त वारकरी आणि वारकऱ्यांच्या नशिबी आहे. काही अडचणीमुळे आपणास पंढरपूरला जाता येत नाही त्या वारकऱ्यांनी किमान दिंडीला वाट लावण्यासाठी तरी यावं हा पुन्हा एकदा महाराजांचा अभंग आहे

**|| पंढरीच्या लागा वाटे**
**सखा भेटे विठ्ठल ||**
**जय हरी माऊली**



--::शब्दांकन::--

**|| महादेव साळुंके ||**
**कवडगव ता.वडवणी जि.बीड**
**मो.९९६०३७२७२४**



cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

बुधवार दि. १७ जुलै २०२४



## जिल्ह्यात सरासरी ३१० मिलिमीटर पाऊस; बीड –शिरूरची टक्केवारी वाढली

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यामध्ये गेल्या २४तासात काही तालुक्यांमध्ये पावसाने जोरदार हजेरी लावली असून बीड , शिरूर,आष्टी,पाटोदा तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याच्या नोंदी आहेत. आतापर्यंत बीड जिल्ह्यात वार्षिक सरासरीच्या तुलनेत ५४.८% एवढा पाऊस झाला असून जिल्ह्यामध्ये३१०,३ मिलीमिटर पाऊस पडला आहे.

यात बीड तालुका ३०३.५ मिलिमीटर, पाटोदा ३७३.४ मिलिमीटर, आष्टी ३५९.३ मिलीमीटर, गेवराई ३१८ मिलिमीटर, माजलगाव२८४.४ मिलिमीटर, अंबाजोगाई ३३१.४मिलिमीटर, केज २८०.४ मिलीमीटर, परळी २६८.३ मिलीमीटर, वडवणी २६३.३ मिलीमीटर तर शिरूर कासार तालुक्यात ३३०.५ मिलीमीटर इतका पाऊस झाला. या पावसाची एकूण सरासरी ३१०.३ मिलिमीटर एवढी होते. हे प्रमाण वार्षिक सरासरीच्या ५४.८% एवढे आहे. बीड जिल्ह्याची वार्षिक सरासरी ५६६ .१ मिलीमीटर एवढी आहे. मागील २४ तासांमध्ये जिल्ह्यात बीड तालुका १३.४ मिलिमीटर, पाटोदा १४.६ मिलिमीटर, आष्टी ५९.१ मिलिमीटर, गेवराई ९.६ मिलिमीटर, माजलगाव ३.६ मिलिमीटर ,अंबाजोगाई ७.२ मिलिमिटर, केज ७.३ मिलिमीटर, परळी ६.५ मिलिमिटर, धारूर ५.६ मिलिमिटर, वडवणी २.१ मिलीमीटर तर शिरूर कासार तालुक्यात २५.२ मिलीमीटर एवढा पाऊस झाला. सर्वाधिक पाऊस आष्टी आणि शिरूर तालुक्यात झाल्याची नोंद आहे. गेल्या २४ तासात पडलेल्या पावसाची एकूण सरासरी १५.१ मीटर एवढी आहे .बीड तालुक्यातील काही गावात अतिवृष्टी झाल्याचेही स्पष्ट झाले आहे.

# अखेर पूजा खेडकर यांचे प्रशिक्षण स्थगित

## २३ जुलैपूर्वी मसुरी अकादमीत परत येण्याचा आदेश

पुणे । प्रतिनिधी

वादाच्या भोवऱ्यात सापडलेल्या प्रशिक्षणार्थी आएएस अधिकारी पूजा खेडकर यांचे प्रशिक्षण स्थगित करण्यात आले आहे. त्यांना महाराष्ट्र राज्य सरकारच्या जिल्हा प्रशिक्षण कार्यक्रमातून मुक्त करण्यात आले आहे. नागरी सेवा परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी अपंगत्व प्रमाणपत्र खोटे केल्याप्रकरणी खेडकर यांच्यावर आरोप आहे.



नितीन गद्रे, अतिरिक्त मुख्य सचिव यांच्या पत्रात असे लिहिले आहे की, लाल बहादूर शास्त्री नॅशनल ॲकॅडमी ऑफ ॲडमिनिस्ट्रेशन, मसूरी यांनी पूजा दिलीप खेडकरचा जिल्हा प्रशिक्षण कार्यक्रम स्थगित ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच त्यांना पुढील आवश्यक कारवाईसाठी त्वरित परत बोलावले आहे. लाल बहादूर शास्त्री नॅशनल ॲकॅडमी ऑफ ॲडमिनिस्ट्रेशनच्या १६ जुलैच्या अधिकृत सूचनेनुसार, पूजा खेडकर यांना महाराष्ट्रातील प्रशिक्षण कर्तव्यातून मुक्त करण्यात आले आहे. त्यांना २३ जुलैपूर्वी मसुरी अकादमीत परत येण्यास सांगितले आहे. खेडकरांच्या नागरी सेवेत निवडीवरून वाद निर्माण झाल्यानंतर काही दिवसांनी हा निर्णय घेण्यात आला आहे. सेवेत स्थान मिळवण्यासाठी अपंगत्व आणि इतर मागासवर्गीय कोट्याचा गैरवापर केल्याचा आरोप त्यांच्यावर आहे. गेल्या आठवड्यात केंद्राने पूजा खेडकर यांच्या उमेदवारीची पडताळणी करण्यासाठी एक सदस्यीय समिती स्थापन केली होती.

### पुण्याच्या कलेक्टरांनी मानसिक छळ केल्याचा पूजा खेडकरांचा आरोप

वाशिम : वादग्रस्त पूजा खेडकर प्रकरणाला आता वेगळं वळण लागलं आहे. पुण्याचे जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांनी आपला मानसिक छळ केल्याची तक्रार पूजा खेडकरांनी केली आहे. पुण्यामध्ये प्रशिक्षणार्थी असताना हा छळ झाल्याची तक्रार पूजा खेडकरांनी केली आहे. सुहास दिवसे यांनी पूजा खेडकरांच्या विरोधात राज्य सरकारला अहवाल दिल्यानंतर या प्रकरणाला वाचा फुटली होती. त्यानंतर आता पूजा खेडकरांची कार्मिक मंत्रालयाच्या समितीकडून चौकशी केली जात आहे. पूजा खेडकरांचा प्रशिक्षणाचा कालावधी संपवण्यात आला असून त्यांना मसुरीतील प्रशिक्षण संस्थेत परत बोलवण्यात आलं आहे.

### पूजा खेडकरला जन्मठेपेची शिक्षा द्या–आ. बच्चू कडू

दिव्यांगांसाठी लढा देणारे प्रहार संघटनेचे अध्यक्ष आ.बच्चू कडू यांनी पूजा खेडकरला जन्मठेपेची शिक्षा द्या, अशी मागणी केली आहे. ते म्हणाले की, यूपीएससीसारखी संस्था अशा पद्धतीने वागत असेल तर आता काय राहिले? हायकोर्टाचे निकाल लोक बदलायला लागले आहेत. या प्रकरणात पूजा खेडकरला तातडीने पदावरुन काढून जन्मठेपेची शिक्षा द्यायला पाहिजे. कारण पुन्हा कुणी असा गुन्हा करणार नाही, असे ते म्हणाले. आ.बच्चू कडू यांनी बोगस दिव्यांगांना इशारा दिला असून, बनावट दिव्यांग प्रमाणपत्र शोधून काढणार असल्याचे म्हटले आहे.

### मकोगिरीमुळे चर्चेत आल्या आणि अडकल्या

*आपल्या चमकोगिरीमुळे चर्चेत आलेल्या पूजा खेडकरांच्याबद्दल रोज नवनव्या बातम्या समोर येत आहेत. प्रशिक्षणार्थी असतानाही स्वत:ला स्वतंत्र केबिन आणि सरकारी गाडीची मागणी पूजा खेडकरांनी केली होती. त्यानंतर त्यांनी निवासी जिल्हाधिकाऱ्यांची केबिन बळकावून त्या ठिकाणी स्वत:चे फर्निचर ठेवले. तसेच स्वत:च्या खासगी ऑडीवर अंबर दिवा लावला. यामुळे पूजा खेडकर चांगल्याच चर्चेत आल्या.*

### बनावट दिव्यांग सर्टिफिकेट

*पूजा खेडकरांची पुण्याहून वाशिमला बदली झाली खरी, पण त्यांच्याबाबतीत अनेक गोष्टी समोर आल्या. पूजा खेडकरांनी यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी बनावट दिव्यांग सर्टिफिकेट काढल्याचे समोर आले. तसेच त्यांची आणि त्यांच्या वडिलांची कोट्यवधींची संपत्ती असतानाही त्यांनी नॉन क्रिमी लेअरचे सर्टिफिकेट काढल्याचे समोर आले.*

## मुख्यमंत्री,उपमुख्यमंत्री,मंत्र्यासह आमदाराचे वेतन, भत्ते,पेन्शन बंद करा–भाई ॲड.नारायण गोले पाटील

माजलगाव । प्रतिनिधी

महसूल कर्मचाऱ्यांचा दि १५ जुलैपासून बेमुदत संप सुरू असून या संपात दांगट समितीच्या अहवालानुसार आकृतीबंध मंजूर करून तात्काळ पद भरती करा यासह इतर मागण्यासाठी महसूल कर्मचारी शासनाच्या विरोधात आंदोलन करत असताना शासन त्यांच्या मागण्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे, वास्तविक महसूल सह सर्वच कार्यालयात अधिकाऱ्यासह कर्मचाऱ्यांची संख्या ही केवळ नगण्य असून रिक्त अधिकाऱ्यासह कर्मचाऱ्यांचे कामकाज या कर्मचाऱ्यांकडे असल्याने नागरिकांची अनेक कामे महिन्यांनी महिने खोळंबून पडत असून नागरिक शासकीय कार्यालयाचे दरवाजे झिजवत असताना शासनाला त्याचे सोयर सुतक राहिलेले नाही करिता महसूल कर्मचाऱ्यांच्या बेमुदत संपाच्या मागण्या मंजूर करून दांगट समितीच्या अहवालानुसार तात्काळ पद भरती करून कार्यालयात खोळंबून पडलेली नागरिकांची कामे करण्याबाबत नवीन नोकर भरती करून उपाययोजना कराव्यात शासनाने



### महसूल कर्मचाऱ्यांच्या बेमुदत संपाला शेकापचा पाठिंबा

२००५ सालापासून विविध कार्यालयातील अधिकाऱ्यासह कर्मचाऱ्यांना पेन्शन बंद केली असताना मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री विविध खात्याचे मंत्री व आमदार यांना मात्र जुनी पेन्शन कायम चालू ठेवून त्यांच्या वेतन,भत्ते व पेन्शन मध्ये शेकडो पटीने वाढ करत त्यांना कोट्यावधीच्या सवलती दिल्या जात आहेत, अधिकारी – कर्मचारी यांच्या पेन्शन मुळे जर राज्याच्या तिजोरीवर बोजा निर्माण होत असेल तर मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री सर्व मंत्री व आमदाराच्या वेतन भत्ते,पेन्शन मुळे राज्याच्या तिजोरीवर बोजा निर्माण होत नाही का ? असा सवाल विचारत जर शासन नवीन नोकर भरतीसाठी तिजोरीत पैसे नसल्याचे कारण सांगत असेल तर राज्यातील मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्यासह सर्वच मंत्री व आमदारांना लागू असलेले वेतन, भत्ते व पेन्शन बंद करून त्यांच्या वेतन,भत्तासह पेन्शन वर होणारा खर्च नवीन नोकर भरतीच्या पगारासाठी वापरण्यात यावा अशी मागणी शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ॲड नारायण गोले पाटील यांनी दि.१६ जुलै रोजी निवेदनाद्वारे तहसीलदार यांच्यामार्फत मुख्यमंत्र्याकडे केली असून मागणी मान्य न झाल्यास शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा देखील भाई ॲड.नारायण गोले पाटील यांनी निवेदनाद्वारे दिला आहे .

## आष्टी तालुक्यातील खून प्रकरणात बीड जिल्हा सत्र न्यायालयाने ठोठवलेली जन्मठेप शिक्षा उच्च न्यायालयात रद्द

छत्रपतीसंभाजीनगर । प्रतिनिधी

**शेरी बु ग्रामपंचायत निवडणुकीतील पराभवाच्या कारणावरून दोन राजकीय गटात झालेल्या मारहाणीत सरपंच पतीचा मृत्यू झाल्याची खळबळ जनक घटना आष्टी तालुक्यातील केरुळ येथे घडली होती. सदर प्रकरणी बीड जिल्हा सत्र न्यायालयाने १४ आरोपी पैकी पाच आरोपींना जन्मठेपेची शिक्षा ठोठावली होती. जिल्हा न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध आरोपींनी उच्च न्यायालयाच्या खंडपीठात आव्हान दिले असता माननीय उच्च न्यायालयाने जिल्हा सत्र न्यायालयाचा निकाल रद्द करून पाच ही आरोपींची निर्दोष मुक्तता केली आहे.**

आष्टी तालुक्यातील शेरी बू ग्रामपंचायत निवडणुकीत पॅनलचा पराभव झाल्याचा राग धरून सुनील नाथ आणि सुनील सूर्यवंशी राहणार केरूळ यांनी आष्टी पोलीस ठाण्याचे तत्कालीन सहायक पोलीस निरीक्षक माने यांच्याशी संगणमत करून सचिन सूर्यवंशी, भाऊसाहेब साबळे, महेंद्र महाजन ,अशोक फल्ले ,कृष्णा शिरसागर व अन्य तीन अनोळखी व्यक्तींनी सुनील नाथ यांचे जवळचे मित्र व कार्यकर्ते यांच्या हस्ते त्यांचे मामा बाळू उर्फ रवींद्र खकाळ यास पिस्टल ,तलवार ,कुकरी अशा हात्याराचा वापर करून ठार मारले यावेळी गोळीबार करून लोखंडी पाईपने त्याच्या सहकारी शाखेर शेख यांना जीवे मारण्याचा प्रयत्न केला. अशा आशयाची फिर्याद प्रवीण गोंदकर राहणार केरूळ तालुका आष्टी यांनी दिनांक ११ /१० /२०११ रोजी आष्टी पोलीसात दिली होती. सदर फिर्यादीवरून आष्टी पोलिसांनी गुन्हा क्रमांक १४९ /२०११ कलम ३०२, ३०७ ३२३, १४७, १४८ ,१४९ भादवी व १४/ २५ ,३ /२५ भा.ह,का प्रमाणे गुन्हा नोंद केला होता सदर तक्रारीनुसार तत्कालीन उपविभागीय पोलीस अधिकारी ज्योती क्षीरसागर यांनी तपास करून याप्रकरणी एकूण १४ आरोपी विरुद्ध दोषारोपपत्र आष्टी न्यायालय दाखल केले होते. आष्टी येथून सदर प्रकरण जिल्हासत्र न्यायालयाकडे वर्ग करण्यात आले सत्र न्यायालयात सदर प्रकर नंबर १६/ २०१२ नुसार नोंदविण्यात आले होते .सदर प्रकरणी सुनावणी अतिरिक्त सत्र न्यायाधीश बीड यांच्यासमोर झाली असता १९/०३/२०१९ रोजी दिलेल्या निकालात आरोपी क्रमांक चार सचिन सूर्यवंशी आरोपी क्रमांक ११ नितीन शिंदे आरोपी क्रमांक १२ सय्यद गौस आरोपी क्रमांक १३ भाऊसाहेब साबळे आरोपी क्रमांक १४ महेंद्र महाजन यांना कलम ३०२, १४७ १४८ ,१४९ भादवी प्रमाणे जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली होती. बीड जिल्हा सत्र न्यायालयाच्या या निर्णयाविरुद्ध वरील आरोपींनी माननीय उच्च न्यायालयाच्या खंडपीठ औरंगाबाद येथे फौजदारी अपील क्रमांक ३४४ /२०१९ प्रमाणे आव्हान दिले होते .सदर प्रकरणाची अंतिम सुनावणी माननीय न्यायमूर्ती आर जी अवचट व माननीय न्यायमूर्ती नीरज धोटे यांच्यासमोर झाली. सुनावणीनंतर जिल्हा सत्र न्यायालयाच्या निर्णयाला रद्द ठरवून वरील आरोपींची उपरोक्त गुन्ह्यात निर्दोष मुक्तता करण्यात आली .आरोपींच्या वतीने उच्च न्यायालयातील खंड पीठातील प्रसिद्ध विधिज्ञ एडवोकेट राजेंद्र हंगे, एडवोकेट मंगेश पोकळे, एडवोकेट अनिरुद्ध हंगे ,एडवोकेट हर्षवर्धन हंगे यांनी काम पाहिले.

## आयुष ग्लोबल इंग्लिश स्कूलमध्ये आषाढी एकादशी मोठ्या उत्साहात साजरी

माजलगांव । प्रतिनिधी

प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी आयुष्य प्ले स्कूलची आषाढी एकादशी मोठ्या उत्साहात संपन्न झाली.यावर्षीची एकादशी आयुष्य ग्लोबल इंग्लिश स्कूल या नवीन शाखेत साजरी करण्यात आली. आयुष ग्लोबल इंग्लिश स्कूलच्या क्रीडांगणात ज्ञानोबा माऊलीच्या गजरात दिंडी सोहळा साजरा करण्यात आला. सोहळ्याची सुरुवात विठ्ठल विठ्ठल नामाच्या गजराने झाली.यावेळी उपस्थित भाग्यश्री करवा(आयुष्य ग्लोबल इंग्लिश स्कूल,संस्थापिका) आणि सागर करवा आयुष ग्लोबल इंग्लिश स्कूल, संचालक ) यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व विठ्ठलाची आरती करण्यात आली. आषाढी एकादशीची माहिती विद्यार्थ्यांना सांगण्यात आली. विठ्ठल रुक्माईच्या भूमिकेत मिवान रेदासानी,आरवी बोबडे,प्रियदर्शनी जोगदंड हे होते. वारकरी आणि वेगवेगळ्या संतांची भूमीका साकारलेल्या वेशभूषेतिल विद्यार्थ्यांनी परिसरात



काढलेली दिंडी आणि माऊली माऊलीचा जयघोष यामुळे चैतन्य अवतरले होते. तसेच काही विद्यार्थ्यांनी नृत्य, अभंग,भजन सादर केले.नवीन शाखा 'आयुष्य ग्लोबल इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी ही मोठ्या जोमाने दिंडीत सहभागी होऊन माऊलीचा जयघोष,भजन फुगड्या,रिंगण खेळून आनंद व्यक्त केला.'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे' या अभंगानुसार विद्यार्थ्यांना वृक्षाचे महत्व यावेळी स्कूलचे संचालक सागर करवा यांनी मुलांना सांगितले. या सोहळ्याची सांगता पसायदान ने करण्यात आली. हा कार्यक्रम योग्य रित्या पार पडावा यासाठी शाळेतील शिक्षिका प्रियंका,अश्विनी शेंडगे,अनिता मोगरेकर,अर्चना सावंत,सुप्रिया खोत,अंकिता लाटे,शारदा भोठे, पुनम ललवाणी, तसेच 'आयुष ग्लोबल इंग्लिश स्कूल'चा संपूर्ण शिक्षक वृंद संतोषी सरोदे,सोनाली यादव,कल्याणी सोळंके,चंद्रकांत फड,रोहित सिरसट, गणेश शिरसट इ. यांनी अखंड परिश्रम घेतली.हा सोहळा आनंदाने व मोठ्या उत्साहाने संपन्न झाला.

## चेक न वटल्या प्रकरणी जामीनदार आरोपीस सहा महिने शिक्षा

### फिर्यादीस ४ लाख ६७ हजार नुकसान भरपाई देण्याचे आष्टी कोर्टाचा आदेश

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील कडा येथील शिवसह्याद्री ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था या पतसंस्थेतून छायाबाई आप्पासाहेब कासार राहणार वटणवाडी ता. आष्टी जि.बीड यांनी पतसंस्थेकडून दुग्ध व्यवसायासाठी कर्ज घेतले होते सदर कर्ज थकल्यामुळे फिर्यादी पतसंस्थेचे मॅनेजर लगड हे छायाबाई कासार यांचे कडे वसुलीसाठी गेले असता छायाबाई कासार यांचा मुलगा गणेश आप्पासाहेब कासार हा सदर कर्ज जामीनदार असल्यामुळे जामीनदार या नात्याने गणेश आप्पासाहेब कासार यांनी छायाबाई आप्पासाहेब कासार यांची थकीत कर्ज रक्कमेपोटी रुपये ३ लाख ६४ हजार ९६४ रुपयाचा चेक दिला होता सदरील चेक निधी अभावी न वटल्यामुळे गणेश आप्पासाहेब कासार यांना नोटीस देऊन ही चेकची रक्कम न दिल्यामुळे फिर्यादी पतसंस्थेने आरोपी गणेश आप्पासाहेब कासार यांचे विरुद्ध आष्टी न्यायालयात क्रि. के.न दि ६/५/२०२० ही निगो. इन्स्ट्? ॲक्टचे कलम १३८ प्रमाणे केस दाखल केली होती. सदर केसमध्ये साक्षीपुरावा होऊन पुरावेअंती आरोपी गणेश आप्पासाहेब कासार यांचे विरुद्ध गुन्हा शिद्ध झाल्यामुळे आष्टी न्यायालयाचे न्यायधीश पी.जी इनामदार मॅडम यांनी आरोपी गणेश आप्पासाहेब कासार यांना सहा महिने साधी कैद शिक्षा व फिर्यादीस रुपये ४ लाख ६७ हजार नुकसान भरपाई देण्याचे आदेश दि ११/ ७/२०२४ रोजी दिले आहे. फिर्यादी पतसंस्थेमार्फत ॲड बी.डी.एकशिंगे यांनी काम पाहिले आहे.

पान ६ वरून...

### वैयक्तिक लाभार्थ्यांना

होत आहे. त्यामुळे या चौकशीत समोर आलेल्या गावात कुठलीही कसूर केली जाणार नाही. योग्य निर्णय घेतला जाईल, असे जिल्हाधिकाऱ्यांसह जिल्हा परिषद प्रशासनाने म्हटले आहे. या सर्व प्रकारांमध्ये गटविकास अधिकाऱ्यांची भूमिका महत्त्वाची राहणार आहे. जर झालेल्या चुका झाकण्याचा प्रयत्न झाला, तर गटविकास अधिकाऱ्यांनी डोळे झाकून कारभार केला का ? हा प्रश्न उपस्थित होणार आहे. त्यामुळे त्यांनी कडक भूमिका न घेतल्यास त्यांच्या विरोधात आम्हाला शासनाकडे दाद मागावी लागेल. त्यामुळे त्यांनी आता बघ्याची भूमिका घेऊ नये.आता वैयक्तिक लाभार्थ्यांनी लाभाची संपूर्ण रक्कम आपल्या खात्यात जमा झाल्याशिवाय बोगस पद्धतीने काहीही लिहून देऊ नये. अन्यथा ते देखील घोटाळे सापडतील. लाभार्थ्यांना पूर्ण लाभ मिळावा हाच जन आंदोलनाचा उद्देश आहे. त्यामुळे दलाली आणि लाच या स्वरूपात गेलेले पैसे देखील लाभार्थ्यांनी आपल्या खात्यातून वळती करून संबंधितांना देऊ नयेत, असेही अँड. देशमुख यांनी म्हटले आहे.

### 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण

यांनी राज्यात ''मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना'' कार्यान्वित केली आहे. महिलांचे वैयक्तिक आर्थिक सबलीकरण करण्याच्या हेतूने दर महा १५०० हजार रुपय मानधन अर्ज दाखल केलेल्या महिलांना मिळणार आहेत. ही योजना राज्यात तातडीने सुरू केली असून, या योजनेचा लाभ घेण्यासाठी २१ ते ६५ वयोगटातील पात्र महिलांनी आपले फॉर्म ऑनलाईन भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन फॉर्म भरणे करिता पुढील कागदपत्रे महिलांनी सोबत आणावेत. आधारकार्ड, बँक पासबुक, मतदान कार्ड, केशरी किंवा पिवळे राशन कार्ड, पासपोर्ट फोटो, असल्यास शाळेचा दाखला या कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती घेऊन याव्यात. ही सुविधा सकाळी ११ ते ०५ यावेळेत सुरु राहील.

### ना.धनंजय मुंडे यांच्या

गरज भासणार नसून १५ ते २२ जुलै या कालावधीत नाव नोंदणी करणे गरजेचे आहे. यासाठी आधार कार्ड, राशन कार्ड लागणार असून १८ ते ४० वर्ष वयोगट यासाठी निश्चित करण्यात आला आहे. नाव नोंदणी अथवा अधिक माहितीसाठी ९९२३८४७६६०, ८२०८९०७७५१ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले असून याचा अधिकाधिक रूग्णांनी लाभ घ्यावा, असे डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.सारिका क्षीरसागर यांनी म्हटले आहे.

## भारतीय कृषी अनुसंधान परिषद ९६ वा स्थापना दिवस निमित्य किसान गोष्टी कार्यक्रम

अंबाजोगाई । प्रतिनिधी

दीनदयाल शोध संस्थान कृषि विज्ञान केंद्र अंबाजोगाई व कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) बीड यांच्या संयुक्त विद्यमाने 'भारतीय कृषी अनुसंधान परिषद ९६ वा स्थापना दिवस' निमित्य दौनापूर, तालुका परळी (वै) येथे कापूस पिकातील अन्नद्रव्य व खरीप पीक व्यवस्थापन विषयावर 'किसान गोष्टी' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून कृषि विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. वसंत देशमुख यांची उपस्थिती होती. प्रमुख मार्गदर्शक म्हणून वनामकृवि प्रादेशिक कृषी विस्तार शिक्षण केंद्रअंबाजोगाईयेथील विस्तार कृषी विद्यावेत्ता डॉ. वसंत सूर्यवंशी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय परळी (वै) येथील मंडळ कृषी अधिकारी कोमल मोरे, कृषि विज्ञान केंद्राचे पिकविद्या शास्त्रज्ञ कृष्णा कर्डिले, कृषी विस्तार शास्त्रज्ञ सुहास पंके, कृषी अभियंता प्रमोद रेणापूरकर, तालुका कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापक कविता फड, कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापक विठ्ठल बिडगर, विव्हल मिश्रा तसेच शेतकरी प्रतिनिधी म्हणून बळीराम आघाव यांची मंचावर उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना सुहास पंके यांनी सांगितले की, भारतीय कृषी अनुसंधान परिषद ही भारतातील एक प्रमुख संस्था आहे; जी कृषी क्षेत्रातील शिक्षण, संशोधन व विस्तार कार्यात अग्रगण्य भूमिका निभावते. परिषदेची स्थापना १६ जुलै १९२९ रोजी झाली होती. हि परिषद केंद्रीय कृषि मंत्रालयाच्या अंतर्गत काम करीत असून मुख्यालय नवी दिल्ली येथे आहे. परिषदेची उद्दिष्टे कृषी, मत्स्यपालन आणि पशुपालन क्षेत्रात नवीन तंत्रज्ञान आणि सुधारित पद्धती विकसित करून शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवणे आहेत. परिषदेने विविध पिके, पशुधन, मत्स्य व कीटकशास्त्र यावर व्यापक संशोधन केले आहे. भारतातील अनेक कृषी विद्यापीठे व संशोधन संस्था यांच्यावर देखरेख करण्याचे काम परिषदेच्या माध्यमातून केले जाते.




परिषदेकडून शेतकऱ्यांसाठी विविध उपक्रम राबवले जातात; ज्यांचा उद्देश शेतीच्या उत्पादन क्षमतेत वाढ करणे व शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य सुनिश्चित करणे आहे. परिषद विविध प्रशिक्षण कार्यक्रम, कार्यशाळा आणि कृषी मेळावे आयोजित करते; ज्यातून शेतकऱ्यांना नवीन तंत्रज्ञान आणि आधुनिक कृषी पद्धतीची माहिती दिली जाते. परिषदेच्या स्थापना दिनाच्या औचित्याने शेतकऱ्यांमध्ये कापूस पिकातील अन्नद्रव्य व्यवस्थापन व खरीप पीक व्यवस्थापन विषयी तंत्रज्ञान व माहिती प्रसारित करण्यासाठी किसान गोष्टी कार्यक्रमाचे आयोजन केले असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी कृषी विज्ञान केंद्राच्या माध्यमातून निर्माण करण्यात आलेले विस्तार घडीपत्रिका 'शेततळ्यातील बाष्पीभवन थांबवण्यासाठीच्या उपाययोजना'चे मान्यवरांच्या शुभ हस्ते प्रकाशन करण्यात आले.

शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. सूर्यवंशी यांनी सांगितले की, कापूस पिकात अन्नद्रव्य व्यवस्थापन महत्त्वाचे आहे. बीड जिल्ह्यात पालाश अन्न घटकाची कमतरता जाणवते. शेतकऱ्यांना अपेक्षित उत्पादकता मिळवण्यासाठी अन्नद्रव्य व्यवस्थापन करणे गरजेचे आहे. अपेक्षित उत्पादकता मिळविताना अनेक घटकांची समस्या जाणवत आहेत. कापूस पिकात सूक्ष्म अन्नद्रव्याचा वापर करणे आवश्यक आहे. नत्र खताच्या अतिरिक्त वापरामुळे रसशोषक किडींचा प्रादुर्भाव वाढतो. योग्य वेळी व योग्य पीक अवस्थेत युरिया खताचा वापर शेतकर्यांनी केला पाहिजे. कापूस लागवडीनंतर १०० व्या दिवशी शेंडा खुडावा. अन्नद्रव्य व्यवस्थापनासाठी जमिनीचा सेंद्रिय कर्ब वाढवता आला पाहिजे. जमिनीतून पिकाच्या अन्नद्रव्याची गरज भागत नसल्यास रासायनिक खताचा वापर करावा लागतो. बोंडसडीच्या व्यवस्थापनासाठी बुरशीनाशकाची आलटून पालटून फवारणी करावी. कापूस पिकांमध्ये लाल्या विकृतीचा प्रादुर्भाव बोंड लागण्याच्या अवस्थेत होतो. अतिपाणी, कमी पाणी, दिवस – रात्रीच्या तापमानातील फरक, कीड–रोगाचा प्रादुर्भाव इत्यादी कारणामुळे लाल्या येण्याची शक्यता असते. विविध कारणामुळे कापूस पिकामध्ये लाल्या येतो. वाढीच्या अवस्थेत झाडाचे पोषण योग्य पद्धतीने होत नाही त्याचा दृश्य परिणाम बोंड लागण्याच्या काळात दिसतो. त्यामुळे अन्नद्रव्य व्यवस्थापन तंत्राचा शेतकऱ्यांनी अवलंब करावा असे आवाहन त्यांनी केले. डॉ. देशमुख यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना कापूस पिकातील गळफांदी व फळफांदी छाटणी तंत्रज्ञान समजावून सांगितले. गळफांदी छाटणी केल्यामुळे कापूस पिकात अन्नद्रव्याचे व्यवस्थापन होते. त्याचा परिणाम उत्पादकता वाढीमध्ये होतो. कापूस घन–लागवड केली असल्यास झाडाचा शेंडा खुडावा असे त्यांनी सांगितले. त्यामुळे झाडाची वाढ नियंत्रित राहून कापूस दाट होणार नाही. सोबतच झाडाला लागलेल्या बोंडांचे व्यवस्थित पोषण होईल. मंडळ कृषी अधिकारी मोरे यांनी मार्गदर्शन करताना कृषी विभागाच्या विविध योजनांची माहिती शेतकऱ्यांना दिली. महाडीबीटी पोर्टलवर शेतकऱ्यांनी नोंदणी करून योजनांचा लाभ घ्यावा असे आवाहन केले. कृष्णा कर्डिले यांनी शेतकरी चर्चासत्रात सहभागी होत शेतकऱ्यांनी खरीप पीक विषयी विचारलेल्या विविध प्रश्नांची समाधानकारक उत्तरे दिली. कार्यक्रम पश्चात कापूस पिकातील गळफांदी छाटणी तंत्रज्ञानाचे प्रात्यक्षिक शेतकऱ्यांना दाखवण्यात आले. गावातील शेतकऱ्यांचा मोठ्या संख्येने सहभाग होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुहास पंके यांनी केले तर आभार कविता फड यांनी व्यक्त केले.

cmyk

# आंदोलन कृषी अधिकाऱ्यांचे; हाल शेतकऱ्यांचे

## पीएम किसानचे काम ठप्प झाल्याने अनुदानाची प्रतिक्षा !

पुणे : पीएम किसानच्या कामाचा भार कृषी विभागाकडे देण्यात आला आहे. दरम्यान या विभागात पुरेसे मनुष्यबळ नसल्याने असहकार आंदोलन पुकारण्यात आले आहे. यामुळे 'पीएम किसान'चे कामकाज ठप्प झाल्याने कोल्हापूर जिल्ह्यात २० हजार शेतकरी लाभार्थ्यांचे कामकाज प्रलंबित असून, त्यांना लाभाची प्रतीक्षा आहे. दरम्यान, या योजनेसाठी मनुष्यबळ पुरविण्याचा प्रस्ताव शासन दरबारी आहे. त्यामुळे कृषी विभागाच्या कर्मचाऱ्यांनी असहकार आंदोलन सुरू केले आहे. परिणामी या योजनेचे काम राज्यभर १५ दिवसांपासून ठप्प आहे. याचा फटका मात्र शेतकऱ्यांना बसत आहे.

कृषी सहायक, कृषी पर्यवेक्षक, मंडळ कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, कृषी उपसंचालक, कृषीतील सर्व वर्गाच्या संघटनेने एक जुलैपासून आंदोलन सुरू केले आहे. त्यामुळे पीएम किसानच्या कामात शेतकऱ्यांना मदत किंवा मार्गदर्शन करण्यासाठी कोणतीही पर्यायी व्यवस्था कार्यरत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांची गैरसोय होत आहे. या योजनेचे काम ऑनलाईन संकेतस्थळावर करावे लागते. त्याचे पासवर्ड व लॉगइन हे तालुका कृषी अधिकाऱ्यांकडे आहेत. शेतकरी आपली समस्या घेऊन कृषी कार्यालयात गेल्यानंतर त्यासंदर्भातील 'ओटीपी' क्रमांक तालुका कृषी अधिकाऱ्यांच्या भ्रमणध्वनीवर येतो. आंदोलन सुरू असल्यामुळे सध्या कोणताही अधिकारी 'ओटीपी'




सांगण्यास तयार नाही, अशी स्थिती आहे. कृषी खात्याने मनुष्यबळ व तांत्रिक सुविधा द्या, अशी मागणी केली होती. योजनेचे काम करण्यासाठी प्रत्येक तालुका कृषी अधिकारी व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयात एक संगणक मदतनीसाची मागणी केली आहे. त्यामुळे नवीन काम ठप्प झाले आहे. मृत शेतकऱ्यांच्या ठिकाणी वारस लावणे, नवीन पात्र लाभार्थ्यांची नोंदणी करणे, तसेच तांत्रिक अडचणी दूर करून रद्द झालेल्या प्रस्तावाचे कामकाज थांबले आहे.

### गतिमान कामकाजासाठी पाठबळ हवे

अधिवेशनामध्ये विषय होऊनही सूचना आलेल्या नाहीत. जून २०२३ पासून सर्व कामकाज व्यवस्थित केले आहे. ऑपरेटर मिळावा, तांत्रिक प्रशिक्षण द्यावे, योजनेचे कामकाज गतिमान करण्यासाठी पाठबळ द्यावे, अशी मागणी राज्य कृषी सेवा वर्ग दोन संघ, पुणे अध्यक्ष बंडा कुंभार यांनी केली आहे.

# आता घरीच तपासा जनावरांचा स्तनदाह!

स्तनदाह हा पशुपालनातील सर्वाधिक आर्थिक हानी करणारा आजार आहे. स्तनदाह या आजाराला ग्रामीण भाषेत 'दगडी' आणि इंग्रजीमध्ये 'मस्टायटीस' या नावाने ओळखले जाते. दुभत्या जनावरांना होणाऱ्या या आजारामुळे पशुपालकांना खूप नुकसान सहन करावे लागते. परंतु या आजारावर एक आनंदाची बातमी आहे.



इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी कानपूर यांनी आधुनिक संशोधन केलेले एक नवीन किट विकसित केली आहे. 'लॅटरल फ्लो इम्युनोसे स्ट्रिप अँड मेथड फॉर डिटेक्शन ऑफ मॅस्टिटिस इन बोवाइन्स' या नावाच्या संशोधित किट द्वारे आता अवघ्या काही मिनिटात स्तनदाहचे निदान करता येणे शक्य होणार आहे.

या किटचे संशोधन रसायन अभियांत्रिकी विभाग, कानपूर आणि राष्ट्रीय केंद्राचे प्रा. सिद्धार्थ पांडा आणि डॉ. सत्येंद्र कुमार, वरिष्ठ प्रकल्प शास्त्रज्ञ यांनी केले आहे. या तंत्रज्ञानाला भारतीय पेटंट कार्यालयाने भारतीय पेटंट क्रमांक ४५५२३२ ने मंजूर दिली असून पॉलीक्लोनल अँटीबॉडी आणि स्ट्रिप चाचणीच्या रूपात नवीन डिझाइन वापरून ही किट तयार करण्यात आली आहे. दुभत्या जनावरांमध्ये स्तनदाह शोधण्यात क्रांती घडवून आणण्याचे या अभिनव तंत्रज्ञानाचे उद्दिष्ट आहे. त्याचा व्यापक वापर सुलभ करण्यासाठी डेअरी उत्पादक कंपनीसोबत तंत्रज्ञान हस्तांतरण सामंजस्य करार देखील पूर्ण केला गेला आहे.

स्तनदाह (मस्टायटीस) हे डेअरी उद्योगांमध्ये आर्थिक नुकसानीचे एक प्रमुख कारण मानले जाते, ज्यामुळे दुधाचे उत्पादन कमी होते. तसेच दुधाची गुणवत्ता देखील खराब होते. या रोगामध्ये स्तन ग्रंथी व कासेच्या ऊतीमध्ये एक दाहक क्रिया घडते जी शारीरिक आघात किंवा सूक्ष्मजीव संसर्गामुळे होते. ज्यामुळे पशुपालकाची मोठी आर्थिक होत असते. अशावेळी ही संशोधित किट वापरून अवघ्या काही वेळात स्तनदाहचे निदान करणे सोपे होणार आहे.

किटद्वारे अशी होते तपासणी : या किटमध्ये दुधाचे काही थेंब टाकल्यावर अवघ्या काही क्षणात मस्टायटीसचे निदान होते. हाताळणीस सोप्या असलेल्या या किटद्वारे पशुपालक देखील सहजरित्या मस्टायटीसचे निदान करू शकतात.

# साखरेला लवकरच मिळणार ४,२०० रूपये हमीभाव

पुणे : राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना संघाचे अध्यक्ष आणि राष्ट्रीय सहकार विकास महामंडळाचे संचालक, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांची केंद्रीय मंत्री अमित शाह यांच्याबरोबर दिल्लीत बैठक झाली असून, केंद्रीय मंत्रिमंडळात निर्णय घेण्याचे त्यांनी आश्वासन दिले आहे, अशी माहिती हर्षवर्धन पाटील यांनी दिली आहे.

क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी यांच्या १०२ व्या जयंतीच्या कार्यक्रमासाठी हर्षवर्धन पाटील हे वाळवा येथे सोमवारी आले होते. त्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत ते म्हणाले, सहकारी साखर कारखानदारीबाबत पुढील दहा वर्षांचा रोड मॅप बनविला असून, साखर उद्योगात आमूलाग्र बदल केले जाणार आहेत. उसाची एफआरपी वाढत असताना त्या तुलनेत साखरेचे दर वाढत नाहीत. त्यामुळे साखर कारखान्यांना मिळणारी तफावतीची रक्कम तुटपुंजी स्वरुपात असल्याने कारखानदारी अडचणीत येत आहे. सहकारी साखर कारखानदारीवर बरेच घटक अवलंबून असून रोजगारक्षम व्यवसाय आहे. यामुळे साखर उद्योग वाचवायचा असेल तर साखरेचे किमान मूल्य प्रति क्विंटल ४,२०० रुपये करण्यात यावे अशी मागणी ५२४ सहकारी साखर कारखान्याच्या राष्ट्रीय संघाने केली आहे. हा प्रस्ताव आता केंद्रीय मंत्रिमंडळासमोर आहे. लवकरच याला मंजूरी मिळेल, असे हर्षवर्धन पाटील यांनी म्हटले. साखर उद्योग वाचविण्यासाठी साखरेचे किमान मूल्य प्रति क्विंटल ४,२०० रुपये करण्यात येणे हा साखर कारखान्यांसाठी एक महत्त्वाचे पाऊल ठरेल.



# पानी फाउंडेशन व सेट्रिज संस्थेमार्फत, गटशेती करणाऱ्याना मोफत मिळणार फळांची रोपे

पानी फाउंडेशन व सेट्रिज संस्थेमार्फत गटशेती करणाऱ्या शेतकऱ्यांना मोफत वृक्ष दिले जाणार आहेत. फळबाग शेती वाढावी या प्रमुख हेतूने हा उपक्रम राबवण्यात येत आहेत.

सत्यमेव जयते फार्मर कपमध्ये सहभागी गटातील शेतकर्यांना पानी फाउंडेशन व सेट्रिज संस्थेमार्फत मोफत वृक्ष दिले जाणार आहेत. फळबाग शेती वाढावी या प्रमुख हेतूने हा उपक्रम राबवण्यात येत आहेत. जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या फळबाग लागवड योजनेत सहभागी व्हावे, यासाठी तालुका निहाय प्रशिक्षण घेतल्याची माहिती पानी फाउंडेशनचे विभागीय समन्वयक संतोष शिनगारे यांनी दिली आहे. सत्यमेव जयते फार्मर कप स्पर्धेअंतर्गत आयोजित गटशेतीद्वारे आपले उत्पन्न वाढवणाऱ्या व खर्च कमी करणाऱ्या गटांना चालना देण्यासाठी विविध फळांची रोपे मोफत दिली जाणार आहेत. यामध्ये आंबा, चिकू, मोसंबी, संत्रा, लिंबू, सीताफळ, जांभूळ, पेरू इत्यादी फळांच्या रोपांचा समावेश करण्यात आलेला आहे.



बांधावर लागवड करायची असेल तर मोहगणी व सागाची रोपेही मोफत दिली जाणार आहेत. गटशेती करणाऱ्या शेतकर्यांनी जास्तीत जास्त फळपिकांची लागवड करून पारंपरिक पीक पद्धतीला फाटा देऊन पैसा देणारी फळपिकांची लागवड करावी, असे आवाहन संतोष शिनगारे यांनी केले आहे. एकत्रित फळबाग लागवड करण्यासाठी या गटांना एकदिवसीय प्रशिक्षणही देण्यात आले आहे.

२२०० शेतकऱ्यांनी हे प्रशिक्षण पूर्ण केले आहे. शेतकर्यांनी खड्डे खोदायला सुरुवात केली असून, लवकरच रोपे लागवड करण्यात येणार आहेत. रोपांसाठी लागणार्या पाण्याचे नियोजन शेतकर्यांनी करणे गरजेचे आहे. रोपांचा खड्डा कसा खोदावा, तो कसा भरावा, रोपांची लागवड कशी करावी, याबद्दल सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले आहे. लवकरच फळपिकांवर आधारित विद्यापीठाच्या शास्त्रज्ञांच्या मदतीने ऑनलाइन डिजिटल शेती शाळाही सुरू करण्यात येणार आहे. यावर्षी पानी फाउंडेशन व सेट्रिज संस्थेमार्फत एक लाख रोपे लागवड करून ते जगवण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. सर्वांनी नियोजन करावे, असे आवाहन पानी फाउंडेशनचे मार्गदर्शक डॉ. अविनाश पोळ, सीईओ सत्यजित भटकळ यांनी केले आहे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१४८९ : निजाम खान यांची सिकंदर शाह द्वितीय यांच्या नावाने दिल्लीचे सुल्तान म्हणून घोषित करण्यात आलं.
१८०२ : मोडी लिपीतून पहिल्यांदाच मुद्रण करण्यात आले.
१८१९ : 'अॅडॅम्स-ओनिस' करारानुसार फ्लोरिडा हे राज्य अमेरिकेने स्पेनकडुन ५ दशलक्ष डॉलर देऊन विकत घेतले.
१८४१ : अतिशय गाजलेल्या 'पंच' या विनोदी साप्ताहिकाचा पहिला अंक प्रकाशित झाला.
१९१७ : किंग जॉर्ज (पाचवा) यांनी फतवा काढून जाहीर केले की त्यांच्या वंशातील पुरुष मंडळी 'विंडसर' हे आडनाव लावतील.
१९४७ : मुंबई ते रेवस अशी जलवाहतुक करणार्या 'रामदास' या फेरीबोटीला गटारी अमावस्येच्या रात्री 'काशाचा खडक' या ठिकाणाजवळ जलसमाधी मिळुन सुमारे ७०० लोक मृत्यूमुखी पडले.
१९५० : देशातील पहिली विमान दुर्घटना पंजाब राज्यातील पठाणकोट येथे घडून आली.
१९५३ : अमेरिकन व्यंग चित्रकार व लेखक वॉल्ट डिझ्नी यांनी अमेरिकेतील ॲनाहेम, कॅलिफोर्निया या दोन ठिकाणी 'डिस्नेलँड' सुरू केले.
१९५५ : वॉल्ट डिस्ने यांनी ॲनाहेम, कॅलिफोर्निया येथे 'डिस्नेलँड' सुरू केले.
१९७५ : अमेरिकेचे अपोलो रशियाचे सोयुझ ही दोन अंतराळयाने एकमेकांस जोडली गेली.
१९७६ : कॅनडातील मॉन्ट्रिअल येथे २१ व्या ऑलिम्पिक स्पर्धांना सुरुवात झाली.
१९९३ : तेलगू भाषेतील प्रतिष्ठेचा मानला जाणारा 'तेलगू थल्ली' हा सर्वोच्च पुरस्कार ज्येष्ठ विचारवंत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना प्रदान
१९९४ : विश्वकप फूटबॉलच्या अंतिम सामन्यात ब्राझिलने इटालीला पेनल्टी शूटआऊटमधे हरवले.
२००० : अभिनेत्री व नृत्यांगना वैजयंतीमाला बाली यांना'भरतनाट्य शिखरमणी' पुरस्कार जाहीर
२००४ : तामिळनाडुतील कुंभकोणम गावात एका शाळेला लागलेल्या आगीत ९० विद्यार्थी मृत्यूमुखी पडले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८८९ : अर्ल स्टॅनले गार्डनर अमेरिकन लेखक आणि वकील (मृत्यू: ११ मार्च १९७०)
१९१७ : भारतीय अभिनेते, गायक आणि पटकथालेखक बिजोन भट्टाचार्य यांचा जन्म. (मृत्यू: १९ जानेवारी १९७८)
१९१८ : ग्वाटेमालाचा राष्ट्राध्यक्ष कार्लोसमनुएल अराना ओसोरिया यांचा जन्म.
१९१९ : स्नेहल भाटकर संगीतकार (मृत्यू: २९ मे २००७)
१९२३ : कूपर कार कंपनी चे सहसंस्थापक जॉन कूपर यांचा जन्म. (मृत्यू: २४ डिसेंबर २०००)
१९३०: बाबुराव बागूल दलित साहित्यिक (मृत्यू: २६ मार्च २००८)
१९५४ : अँजेला मेर्केल जर्मनीच्या चॅन्सेलर
१९५९ : भारतीय हिंदी आणि मल्याळम चित्रपट अभिनेत्री जरीना वहाब यांचा जन्मदिन.
१९६९ : भारतीय हिंदी आणि भोजपुरी चित्रपट अभिनेता रवी किशन यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७९० : ॲडॅम स्मिथ स्कॉटिश अर्थशास्त्रज्ञ आणि तत्त्ववेत्ता (जन्म: ५ जून १७२३)
१८३५ : मेघालय सम्राट तिरोट सिंग यांचे निधन.
१९२८ : भारताच्या ज्येष्ठ समाजवादी नेत्या आणि भारतीय संसदेच्या सदस्या मृणाल गोरे यांचे निधन.
१९७२ : गुजरात राज्यातील प्रसिद्ध राजकारणी आणि 'अखिल भारतीय किसान सभे'चे नेते, इंदुलाल याज्ञिक यांचे निधन.
१९९२ : कानन‌देवी बंगाली व हिंदी चित्रपटातील अभिनेत्री व गायिका १९३० ते १९५० (जन्म: २२ एप्रिल १९१६)
१९९२ : शांता हुबळीकर प्रभातच्या 'माणूस' चित्रपटामुळे गाजलेल्या अभिनेत्री, पुणे महापालिकेतर्फे 'बालगंधर्व पुरस्कार' (जन्म: १४ एप्रिल १९१४)
२००५ : युनायटेड किंगडमचे पंतप्रधान सर एडवर्ड हीथ यांचे निधन.
२०१२ : मृणाल गोरे समाजवादी नेत्या आणि ६ व्या लोकसभेच्या सदस्य (जन्म: २४ जून १९२८)
२०१२ : भारतीय-इंग्रजी राजकारणी मार्शा सिंह यांचे निधन. (जन्म: ११ ऑक्टोबर १९५४)
२०२० : सी.एस. शेषाद्री भारतीय गणितज्ञ व चेन्नई मॅथेमॅटिकल इन्स्टिट्यूटचे संस्थापक पद्म भूषण, शांती स्वरूप भटनागर पुरस्कार (जन्म: २९ फेब्रुवारी १९३२)

# कृषी स्टार्टअप आणि उद्योजक उपक्रमांसाठी नाबार्डच्या ॲग्रीशुअर द्वारे ७५० कोटीचा कृषी निधी

पुणे : कृषी आणि ग्रामीण क्षेत्रातील असलेल्या आव्हानाचा सामना करण्यासाठी तसेच या क्षेत्रातल्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचण्यासाठी इनोव्हेशन आणि तंत्रज्ञानाची आवश्यकता आहे. आपले बहुतेक शेतकरी अल्पभूधारक आहेत. यासाठी उत्पादकता वाढवण्यावर भर देणे आवश्यक असून त्यासाठी तंत्रज्ञान महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकते. हे उद्दिष्टे साध्य करण्यासाठी पद्धतशीर यांत्रिकीकरण विकसित करणे आवश्यक आहे. कृषी आणि शेतकरी कल्याण विभाग राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँकच्या सहकार्याने कृषी स्टार्ट-अप आणि उद्योजकांसाठी 'ॲग्रीशुअर' हा कृषी निधी लवकरच जाहीर करणार आहे. कृषी आणि संलग्न क्षेत्रांमध्ये नाविन्यपूर्ण, तंत्रज्ञान-आधारित प्रभावी पावलं उचलून धाडसी निर्णय घेत गुंतवणुकीला प्रोत्साहन देणे हे या दूरदर्शी उपक्रमाचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी मुंबई येथे सर्व भागधारकांची या संदर्भात बैठक झाली असून या अंतर्गत ७५० कोटी रूपयांच्या श्रेणी- पर्यायी गुंतवणूक निधी ची स्थापना करून भारताच्या कृषी क्षेत्रात नाविन्य आणि शाश्वततेला चालना देण्याचे उद्दिष्ट या उपक्रमाद्वारा पूर्ण करण्यात येणार आहे.

हा निधी कृषी क्षेत्रातील इनोव्हेशन, कृषी उत्पादन मूल्य साखळी बळकट करणे, ग्रामीण पायाभूत सुविधा निर्माण करणे, रोजगार निर्मिती आणि शेतकरी उत्पादक संस्थांना साहाय्य देण्यावर लक्ष केंद्रित करेल. त्याबरोबर, हा निधी शेतकऱ्यांसाठी माहिती तंत्रज्ञान-आधारित उपाय आणि यंत्रसामुग्री भाड्याने देण्याच्या सेवांना प्रोत्साहन देईल. नाबार्डची पूर्ण मालकीची उप-कंपनी ही ॲग्रीशुअर निधी व्यवस्थापक असेल. हा निधी १० वर्षांसाठी कार्यरत राहील या दृष्टीने डिझाइन केला असून, दोन किंवा अधिक वर्षांपर्यंत वाढवता येईल. या निधीची वैशिष्ट्ये म्हणजे ७५० कोटी रूपयांच्या प्रारंभिक निधीसह हा निधी स्थापन केला जाईल. नाबार्ड आणि कृषी मंत्रालयाकडून प्रत्येकी २५० कोटी आणि इतर संस्थांकडून २५० कोटी रुपये यासाठी घेतले जातील. या निधीच्या सहाय्याने कृषी क्षेत्रातील अभिनव आणि शाश्वत उपाय प्रदान करण्यासाठी स्टार्ट अप्सना पाठिंबा देण्याचे उद्दिष्ट आहे. च्या घोषणेबाबत बोलताना नाबार्डचे अध्यक्ष शाजी के. व्ही. म्हणाले, कृषी क्षेत्राचे डिजिटलायझेशन ही कृषी मूल्य साखळी वाढवण्यासाठी काळाची गरज आहे, कारण विकासाची पुढली लाट इनोव्हेशन यातून येणार आहे. किमान खर्चासह शेवटच्या गावाला जोडण्यासाठी कृषी क्षेत्रातील फिनटेक इनोव्हेशन ही एक महत्त्वाची बाब आहे.

शेतकरी हा कृषी मूल्याचा पाया आहे, आणि त्यांना अतिशय बारकाईने हाताळणे आणि उपाय उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. केवळ कर्ज पुरवठा करून कृषी क्षेत्रातील समस्या सुटणार नाही. इनोव्हेशन द्वारे पुढल्या स्तराचा विकास होईल आणि त्यासाठी सार्वजनिक आणि खाजगी संस्थांनी सह-भागीदारी करणे आवश्यक आहे. या निधीद्वारा प्रारंभिक टप्प्यातील नव संशोधकांना मदत करणे आणि शेतकर्यांना व्यवहार्य, शाश्वत आणि टिकाऊ तंत्रज्ञान उपायांसह सहाय्य करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. नाबार्डने कृषी क्षेत्राच्या अनियंत्रित समस्या दूर करण्यासाठी युवा नव संशोधकांना आपल्या देशाच्या 'विकसित भारत' च्या प्रवासात त्यांच्या अभिनव उपायांसह योगदान देण्याचे आवाहन केले आहे. या बैठकीला बँका, वित्तीय संस्था, विमा कंपन्या, एआयएफएस आणि कृषी क्षेत्रात कार्यरत स्टार्टअप्सचे प्रतिनिधी एकत्र आले होते.



# व्यवस्थापकीय संचालक धम्मज्योती गजभिये हटवा

## संत रोहिदास चर्मोद्योग महामंडळ वाचवा; नानासाहेब घोडके यांचा आमरण उपोषणाचा इशारा

माजलगाव । प्रतिनिधी

मुंबई येथील संत रोहिदास चर्मोद्योग विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक धम्म ज्योती गजभिये यांच्या अनागोंदी कारभारामुळे हे मंडळ लयास चालले असल्याने त्यांना तात्काळ हटवा आणि जुने आणि नवीन प्रकरणे तात्काळ निकाली काढण्यात यावेत या मागण्यांसाठी राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे बीड जिल्हा अध्यक्ष यांनी आमरण उपोषनाचा इशारा काल येथील जिल्हा अधिकारी यांना दिलेल्या निवेदनातुन दिला आहे दि १५ जुलै रोजी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या लेखी निवेदनात नानासाहेब घोडके यांनी म्हंटले आहे की , २०१६-१७ आर्थिक वर्ष हे संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळातील शेवटचे टार्गेट आलेले वर्ष आहे. त्यानंतर जवळपास ७ वर्षानंतर म्हणजेच २०२३-२४ मध्ये महामंडळास नवीन टार्गेट पूर्ण होऊन ही प्राप्त झाले नाही.




५०,०००/- सारखे शुल्क कर्जासाठी लाभार्थी यांना वारंवार कागदपत्रे मागितले जातात काही लाभार्थी कर्ज भेटत नाही. परंतु जे लाभार्थी मुंबई येथे वारंवार फेरी मारतात त्यांना कर्ज लवकर भेटत आहे. म्हणजेच समाजातील काही दलाल यांना हाताशी धरून व्यवस्थापकीय संचालक श्री. धम्मज्योती गजभिये धनादेश काढायचे असे बेकायदेशीर पणे काम करीत असुन महामंडळाची लुटही करीत आहेत. हा चर्मकार समाजावर अन्याय नाही का? २०२४-२५ हे संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाचे सुवर्ण वर्ष जयंती निमीत्ताने शासन आपल्या दारी ला अनुसरून लिडकॉम आपल्या दारी या कार्यक्रमातून काय साध्य झाले हे अद्याप ही निष्पन्न झालेले नाही. खरच या आयोजित कार्यक्रमात जेवढा खर्च व्यवस्थापकीय संचालक श्री. धम्मज्योती गजभिये यांनी केला तेवढा खर्च करायची गरज होती का?

सद्याचे व्यवस्थापकीय संचालक करीत आहेत तसेच त्यांच्या अंतर्गत काम करणारे अधिकारी व कर्मचारी यांची घुसमट करून मंत्रालयातील वरिष्ठांना चुकीच्या व खोट्या बातम्या देऊन स्वतःची प्रसिध्दी करून घेण्याचे काम व्यवस्थापकीय संचालक साहेब हे खुप चांगल्या प्रकारे करीत आहेत.जे कायम कर्मचारी आज २०-४० वर्षांपासुन महामंडळात आपली सेवा देत आहेत त्यांना अद्यापही पदोन्नती पासुन वंचित ठेवण्यात आले आहे. तर नविन कंत्राटी कर्मचारी आजी व्यवस्थापकीय संचालक यांच्या आदेशाने महामंडळात समाविष्ट करण्यात आलेले आहेत. (खासकरून नागपुर येथून आणलेले व मुंबई येथे कार्यरत असलेले) त्यांना महामंडळाने ३०,०००/- ते ४०,०००/- येवढ्या मानधनावर सामिल केले आहे. हा त्या कंत्राटी कर्मचाऱ्यांवर अन्याय नाही का ? जो १५ वर्षांपासुन महामंडळास सेवा देत आहेत त्यांच काय ? तर या उलट मागील १ वर्षात महामंडळात काही कर्मचाऱ्यांची प्रतिनियुक्ती वर सेवेची सुरुवात करण्यात आलेली आहे. त्यात श्री. साहु (नागपुर) यांची कंत्राटी पदावर साधारणतः २,००,०००/- एवढ्या मानधनावर नियुक्ती करण्यात आल्याचे समजते.ते महामंडळात अशी कोणती भुमीका निभावतात ? त्या मुळे गजभिये आणि श्री. गोंडाणे यांची सखोल चौकशी करण्यात यावी व महामंडळातील अश्या महत्वाच्या पदावर कार्यरत आहेत.काही सुत्रांकडून अशी ही माहिती मिळालीय की,श्री.गोंडाणे हे नोव्हेंबर २०२३ मध्ये बार्टी मध्ये कार्यरत असताना त्यांनी तेथून रक्कम रु.२,००,०००/- ॲडव्हान्स स्वरुपात उचलली असुन त्यांनी त्याचा भरणा न करता ते माहे फेब्रुवारी २०२४ पासुन लिडकॉम महामंडळात कार्यरत झाले. तत्पुर्वी श्री.गोंडाणे हे व्यवस्थापकीय संचालक यांचे समवेत भारतीय डाक येथे ही कार्यरत होते तसेच बार्टीमध्ये ही त्यांची एकमेकांना साथ होती. आणि आता लिडकॉम महामंडळात ही सोबती आहेत याचा नेमका अर्थ काय होतो ? संकलन करण्याकरीताच व्यवस्थापकीय संचालक हे श्री. गोंडाणे यांना सोबत घेऊन फिरतात का असा ही प्रश्न उद्भवतो. तरी ही बाब गंभीर असुन या दोन्ही व्यक्तींची चौकशी करण्यात यावी.व अश्या लालची धम्मज्योति गजभिये यांना तात्काळ हटवा आणि महामंडळ वाचवाया इतर महत्त्वाच्या मागणी साठी राष्ट्रीय चारकर महासंघाचे अध्यक्ष तथा समाज कल्याण मंत्री बबनराव घोलप व महासचिव व माजी लीडकॉम अध्यक्ष ज्ञानेश्वर कांबळे यांच्यास मार्गदर्शना खाली दि.२२ जुलै २०२४ पासुन जिल्हा कार्यालय बीड समोर आरमण उपोषणाला बसणार आहे.मी मधुमेह, उच्च रक्तदाब या व्याधींनी त्रस्त आहे. जर माझ्या जीवीतास काही हानी झाली तर सर्वस्वी जबाबदारी ही आपली राहिल.असे ही नानासाहेब घोडके यांनी निवेदनात म्हंटले आहे. या वेळी राजेश जाधव युवा जिल्हाध्यक्ष, ज्ञानोबा माने माजी जिल्हाध्यक्ष, सुनील माने कर्मचारी जिल्हाध्यक्ष,दासराव गोरे सल्लागार, हानुमाण सोनवणे जिल्हा कार्याध्यक्ष, बाळासाहेब गवळी उप जिल्हाध्यक्ष,बंडु शिंदे युवा उप जिल्हाध्यक्ष , सामाजिक नेते सुभाष गायकवाड, सुभाष कांबळे माजलगाव तालुकाध्यक्ष, हारीचंद्र पवार, अशोक फसले,यशराज बामणे, नवनाथ खरात, अर्जून केगार,नंदु केगार, साहेबराव गुळवे,मसु कांबळे, राजेंद्र मिसाळ, जनार्दन नेटके व समाज बांधव उपस्थित होते.

## लाडकी बहीण योजनेतील लाभार्थ्यांचे १५ ऑगस्टपर्यंत अर्ज पुर्ण करा- आ.सोळंके



माजलगाव । प्रतिनिधी

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना आणि सोयाबीन व कापूस पिकासाठी शेतक-यांना प्रति हेक्टरी ५०००/- रू. अनुदान देण्याबाबत दि १६ जुलै मंगळवार रोजी आ. प्रकाश सोळंके यांच्या अध्यक्षतेखालील तहसील कार्यालय, माजलगाव येथे आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती.या बैठकीत त्यांनी सविस्तर आढावा घेतला असता लाडकी बहीण योजनेत पात्र लाभार्थी संख्या माजलगाव तालुका (४०१६०),धारूर तालुका (१९७७९), वडवणी तालुका (१५७२८) असे एकुण ७५,६६९ महिलांना या योजनेचा लाभ मिळणार असुन प्रति महा १५००/- रुपायांचे अनुदान मिळणार आहे.या योजनेसाठी अर्ज भरण्याची अंतिम तारीख ३१ ऑगस्ट २०२४ आहे.

या आढावा बैठकीत आ.प्रकाश सोळंके यांनी तिन्ही तालुक्याचे तहसीलदार, गटविकास अधिकारी, सीडीपीओ यांना दि १५ ऑगस्ट २०२४ पर्यंत सर्व लाभार्थ्यांचे अर्ज भरुन घ्यावेत,अशा सूचना दिल्या.त्याच प्रमाणे माजलगाव तालुका- सोयाबीन ३०,७५४ हे. व कापूस - २६६४१, वडवणी तालुका - सोयाबीन ६६८२ हे. व कापूस -१६३६९, धारूर तालुका - सोयाबीन- १३४६२ व कापूस - २०९१६ हे.

लागवडी खालील क्षेत्र असणा-या शेतक-यांच्या याद्या तयार करून अनुदानाची मागणी करावी,अशा देखील सूचना दिल्या.या वेळी उपविभागीय अधिकारी श्री. इंगोले,तहसीलदार भारस्कर, तहसीलदार कांबळे, तहसीलदार शेंगडे, गटविकास अधिकारी जोत्शना मुळीक,संतोष वंगवाडे, नागरगोजे,तालुका आरोग्य अधिकारी घुबडे व इत्यादी उपस्थित होते.

## अश्वलिंग विद्यालयाच्या विद्यार्थ्यांची वारकरी दिंडी

पिंपळवंडी । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील श्री.अश्वलिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापक व शिक्षकांनी या वर्षी आगळावेगळा उपक्रम राबवून आषाढी एकादशी प्रित्यर्थ दि.१६ जुलै २०२४ मंगळवार रोजी विद्यार्थ्यांची पायी दिंडी सोहळ्याचे आयोजन केले होते. आषाढी वारी निमित्त महाराष्ट्रातील सर्वच पायी दिंड्या पंढरीच्या पांडुरंगाच्या भेटीसाठी पंढरपुरात पोहचल्या आहेत.



हातात भगवी पताके,टाळ मृदंगाच्या गजरात आणि ज्ञानोबा माऊली तुकाराम व विठुरायाच्या भजनाच्या नाम घोषात ही दिंडी शाळेपासून गावातील प्रमुख रस्त्यावरून गावात काढण्यात आली होती.यावेळी विद्यार्थी-विद्यार्थ्यांनी वारकऱ्यांची वेशभूषा परिधान केली होती. डोक्यावर तुळशीवृंदावनचाही समावेश होता.या दिंडीचे ठिकठिकाणी महिलांनी स्वागत केले.

शिक्षक व विद्यार्थ्यांनी फुगडीचा आनंद लुटला.या पायी दिंडीत इयत्ता ५ वी ते १२ पर्यंतचे सर्व विद्यार्थी-विद्यार्थिनी सह मुख्याध्यापक भोसले सर तसेच तोतरे,जरे,शिंदे ,बडे,अभिषेक पवार,प्रा.तरटे, प्रा.बोडखे, प्रा.अशोक पवार सर,प्रा.शाम पवार, प्रा.वाघुले ठाणगे , शेखर पवार,जानू मामा,अशोक मामा, सुरेश पवार, वाळके मामा सहभागी झाले होते.

## बजरंग बली वेताळ मंदिर येथे गुरुपौर्णिमा उत्सवाचे आयोजन

परळी । प्रतिनिधी

श्री बजरंग बली वेताळ मंदिर येथे रविवार दिनांक २१ जुलै रोजी गुरुपौर्णिमा उत्सवाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती मंदिराचे महंत श्री विलासनंदजी महाराज यांनी दिली आहे.

प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी पंचम ज्योतिर्लिंग प्रभू श्री वैजनाथ मंदिर जवळ असलेले श्री बजरंग बली वेताळ मंदिर येथे रविवार दिनांक २१ जुलै रोजी गुरुपौर्णिमा उत्सवाचे आयोजन करण्यात आले असून दुपारी बारा वाजता श्रींची महाआरती होणार आहे. तसेच दिवसभर धार्मिक कार्यक्रम होणार असून दुपारी एक वाजता महाप्रसाद वितरण होणार आहे. या कार्यक्रमास परळी शहर व पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री बजरंग बली वेताळ मंदिराचे महंत श्री विलासनंदजी महाराज यांनी केले आहे.

## केज शहरातील नागरी वस्तीत चार रोहीत्र मिळणार-खा.बजरंग सोनवणे

केज । प्रतिनिधी

केज शहरातील वारंवारित खंडित होणारा वीज पुरवठा व कमी दाबाने कमी दाबाने होणारा विद्युत पुरवठा या नागरिकांच्या समस्यांची दखल खा. बजरंग सोनवणे यांनी घेऊन वीज वितरणचे अधिकाऱ्यांना नवीन उच्च क्षमतेच्या चार रोहीत्राचा प्रस्ताव तयार करून मंजूरीसाठी पाठविण्याचे कळविले आहे.

केज शहरातील शिक्षक कॉलनी, अहिल्या नगर, सब स्टेशन आणि दूध डेअरी या भागात अत्यंत कमी दाबाने वीज पुरवठा होत आहे तसेच तो वारंवार खंडित होत असल्याने या भागातील नागरिकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत होते. दरम्यान या भागातील नागरिकांनी खासदार बजरंग सोनवणे यांची भेट घेऊन ही समस्या सोडवण्याची मागणी केली. त्या नुसार खा. बजरंग सोनवणे याची तात्काळ दखल घेत विज वितरण विभागाशी संपर्क साधून या भागातील समस्या सोडविण्यासाठी २०० के व्ही क्षमतेचे चार विद्युत रोहितत्राचे प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयाला पाठविले आहेत. लवकरच चार नवीन रोहित मिळणार असल्याने या भागातील नागरिकांची विजेची समस्या कायमची सुटणार आहे.

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्ती योजने अंतर्गत अर्ज दाखल करण्याचे अवाहन

बीड । प्रतिनिधी

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.) जिल्हा कार्यालय बीड मार्फत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत असुन या योजनेसाठी मातंग समाज व तत्सम १२ पोट जातीतील सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात १० वी, १२ वी, पदवी, पदव्युत्तर, वैद्यकिय व अभियांत्रिकी इत्यादी अभ्यासक्रमांमध्ये विशेष प्राविण्याने गुणवत्ता मिळवुन ६० टक्के गुण किंवा त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त झालेल्या विद्यार्थी, विद्यार्थीनीकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर शिष्यवृत्तीचे वितरण करण्यासाठी जास्त टक्केवारी प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांची गुणानुक्रमानुसार निवड मुख्यालय मुंबई यांच्याकडुन उपलब्ध निधीच्या प्रमाणात केली जाते याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

सदर योजनेचा अर्ज भरत असताना अर्जासोबत अर्जदाराचा जातीचा दाखला (सक्षम अधिकारी यांच्याकडुन घेतलेला (असावा), अर्जदाराच्या कुटुंबाच्या उत्पन्नाचा दाखला (तहसिलदार यांच्याकडुन घेतलेला असावा), रेशन कार्ड, आधार कार्ड, झेरॉक्स प्रत, गुणपत्रक, दोन पासपोर्ट साईज फोटो, बोनाफाईड / पुढील वर्षात प्रवेश घेतल्याची पावती इत्यादी कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे. अर्जदाराने साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.) डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्यायभवन, नगर रोड जिल्हा कार्यालय बीड येथे ऑफलाइन पद्धतीने बुधवार दि. २४ जुलै २०२४ पर्यंत अर्ज भरावे, असे अवाहन साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.). जिल्हा व्यवस्थापक व्हि. एस. सोनवणे, यांनी केले आहे.

## माऊली प्राथमिक विद्यालयात रंगला दिंडी सोहळा

बीड । प्रतिनिधी

आज दिनांक १६ रोजी आषाढी एकादशिनिमित्त दिंडी सोहळा मोठ्या उत्साहात पर पडला यावेळी दिंडी राजीव गांधी मार्गे कॅनॉल रोड,नवगण कॉलेज रोड मार्गे भाग्य नगर येथील मंदिरात पोहचली.यावेळी मंदिरात विद्यार्थ्यांनी भक्तीगीत तसेच अभंग यांचे गायन केले त्याच बरोबर भक्तिगीतावर नृत्य सादरीकरण करून परिसरातील लोकांकडून दाद मिळवली.

यानंतर या बालगोपाल वारकऱ्यांची दिंडी पुढे मार्गस्त होऊन नवगण कॉलेज मधील बालरंगभूमी नाट्य परिषद बीड आयोजित दीपा क्षीरसागर यांच्या मार्गदर्शना खालील आषाढी एकादशी निमित्त दिंडी सोहळ्यात



सहभागी झाली.यावेळी माऊली प्राथमिक विद्यालय बीड,संभाजी प्राथमिक विद्यालय, गणेश विद्या मंदिर बीड या शाळेचा सहभाग होता.कार्यक्रमासाठी माऊली प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष माने, संभाजी प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका वीणा भोज,गणेश विद्या मंदिर चे मुख्याध्यापक उमेश पवार व सर्व शिक्षक व ६०० ते ७०० बाल वारकरी यांची उपस्थिती होती.यावेळी विद्यार्थ्यांचा भक्ती गीत गायन,नृत्य यांचे सादरीकरण करण्यात आले.या नंतर दिंडी मार्गस्त होऊन शाळेत पोहचली.शाळेत विद्यार्थ्यांना अल्पोपहार देऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शाळेचे मुख्याध्यापक संतोष माने सहशिक्षिका वंदना आवाड,थिटे संजीवनी,वायखिंडे अंकिता,जाधव मनीषा,मोराळे प्रतिभा,नेहरकर मॅडम,सहशिक्षक सचिन पवार,डोळस रमाकांत यांचे तसेच पालक यांचे योगदान लाभले.

## जाधवांची तिसरी पिढी पोलीस खात्यात दाखल

### जाधव घराण्याला शिक्षणाचा मोठा वारसा

जाधव घराण्याला शिक्षणाचा मोठा वारसा लाभलेला आहे. ॲड. आदर्श अरुणराव जाधव हे (जिल्हा व सत्र न्यायालय,बीड) येथे विधी शाखेमध्ये आपली सेवा देत असून,एक मुलगी प्रीती अरुणराव जाधव या वैद्यकीय क्षेत्रामधे अधिपरीचारिका म्हणून आपली सेवा देत आहेत, तर आता लहान मुलगा देखील देशसेवेसाठी पोलीस खात्या मधे दाखल झाला आहे.

बीड । प्रतिनिधी

अरुणराव लक्ष्मणराव जाधव (सहा.पोलीस उप निरीक्षक) यांचे वडील लक्ष्मण वामनराव जाधव हे पोलीस खात्यामध्ये कार्यरत होते त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवत अरुण जाधव हे देखील पोलीस खात्यामध्ये पोलीस कॉन्स्टेबल म्हणून रुजू होऊन ४० वर्ष देश सेवेसाठी दिले व सहायक पोलीस उप निरीक्षक या पदावर निवृत्त झाले. आता त्यांचाच वारसा जपत गणेश अरुणराव जाधव हे देखील देशसेवेसाठी पोलीस खात्यामध्ये रुजू झाले आहेत. अशा रितीने जाधवांची तिसरी पिढी पोलिस खात्यात दाखल झाली आहे.



लहान पणापासूनच पोलीस खात्याची आवड असल्यामुळे व परिवारामध्ये सुद्धा खाकीचे वातावरण असल्याने ते बाळकडू लहानपणी च भेटले. व आपल्या वडिलांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून आपल्या घराण्याचा वारसा जपत आता पोलीस खात्यामधे रुजू झाले आहेत. बीड जिल्ह्यातील मोरगाव या छोट्याशा खेडेगावातून येऊन गणेश जाधव याने शालेय स्पर्धा पासून ते विद्यापीठ स्पर्धा पर्यंत बास्केटबॉल या खेळामध्ये महाराष्ट्रात आपल्या नावाचा डंका वाजवला. राज्यस्तरीय बास्केटबॉल स्पर्धे मध्ये विशेष प्रावीण्यसह प्रथम येऊन राष्ट्रीय पातळीवर खेळत आपल्या जिल्ह्याचे चे नाव मोठे केले. त्याच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून कौतूक होत असून, पुढील वाटचालीस अनेकांकडून शुभेच्छा देण्यात येत आहेत.

## लोकप्रियतेचा गैरफायदा टीआरपी वाढवण्यासाठी करु नये -राम कुलकर्णी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

भाजपाच्या नेत्या पंकजाताई मुंडे यांच्या लोकप्रियतेचा टीआरपी वाढवण्यासाठी गैरफायदा घ्यायचा आणि फेक न्युज करून त्यांच्याविषयी समाजात आणि राजकारणात गैरसमज निर्माण करायचे आणि वेगळा नरेटिव्ह प्रस्थापित करण्याचा धंदा मागच्या काही वर्षापासुन इलेक्ट्रॉनिक मिडियाच्या चॅनेलने हातात घेतला. वास्तविक पहाता असे केल्याने त्या लोकांना मिळतयं काय?असा सणसणीत सवाल भाजपाचे प्रदेश प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी करत एका शुद्ध कर्माने सकारात्मक दृष्टीकोनातुन राजकारण करणार्या महिला नेतृत्वाला मागे ओढण्याचे कुकर्म केवळ आपला टीआरपी वाढवण्यासाठी करणं बरं नसल्याचंही त्यांनी म्हटलं.समाजातली विश्वासार्हता जोपासण्यासाठी माध्यमानं सत्यावर आधारीत काम करण्याची गरज असल्याचा सल्लाही त्यांनी दिला.

लोकनेत्या पंकजा मुंडे यांच्याबाबत मागच्या पाच-दहा वर्षापासुन जाणिवपुर्वक इलेक्ट्रॉनिक मिडियाचे काही चॅनेल तथा माध्यमातले काही वर्तमानपत्र सत्यपणावर आधारित बातम्या न देता केवळ नरेटिव्ह समाजात कसा निर्माण होईल ?यासाठीच धडपडतात. वास्तविक पहाता गत वीस वर्षापासुन राजकारणात काम करताना एक महिला नेतृत्व राजकिय संघर्ष कसा करते आणि सत्ता पदावर असल्यानंतर लोकाभिमुख काम कसे करते? त्यांनी दाखवुन दिलेले आहे. शुद्ध कर्म, पारदर्शकता आणि सामान्य माणसाच्या कल्याणासाठी त्यांची भुमिका नेहमीच राहते. एक गोष्ट खरी आहे की या राज्यात त्यांच्या नावाचे वलय आणि नेतृत्वाची लोकप्रियता जनमाणसात प्रचंड



असल्याने कोणतीही बातमी त्यांच्याबाबत चर्चेची होती ज्यामुळे टीआरपी वाढतो. अनेकदा त्या जे बोलल्या नाहीत तेच तोंडी टाकल्या जातं, त्यांचा बोलण्याचा भावही लक्षात घेतला जात नाही.केवळ वेगळा विमर्श कसा तयार होईल? यासाठी जेणेकरून चॅनेलची टीआरपी वाढेल या शोधातही काही मंडळी असते. गंमत बघा, पुजा खेडकर प्रकरणात पंकजाताईचा मुळात संबंधच काय? ना त्यांच्या कुणी नातेवाईक? ना त्या कार्यकर्त्या? त्यांच्या कुटुंबियातलं भाजपात कुणी काम करत असेल तर प्रकरणाचा नेतृत्वासोबत जोडण्याचा संबंध नाही. दुसरी महत्वाची गोष्ट त्यांनी गोपीनाथ प्रतिष्ठानला दिलेला धनादेश ज्याची कुठेही एंट्री नाही आणि अशा प्रकारे ताई कुणाची मदतही घेत नाहीत. उद्या कुणी कुठलाही धनादेश कुणाच्या नावाने लिहुन व्हायरल करेल तर त्याला अर्थ तरी काय? असा सवालही राम कुलकर्णी यांनी विचारला. वैद्यनाथ कारखान्यावर जीएसटीची धाड पडल्यानंतर राज्यातुन सुमारे ०९ कोटी रूपये निधी म्हणुन हितचिंतक, कार्यकर्त्यांनी पंकजाताईला देवु केले. या नेतृत्वाने देणार्याचे आभार मानत एक रूपाया देखील कुणाचाही न घेता मदत नाकारली. मात्र जणु काही पुजा खेडकर यांना भाजपानेच नोकरी दिली या आवाजात पंकजाताईचा संबंध जोडून काही चॅनेलवाल्यांनी बातम्या लावल्या. त्याची शहानिशा केली नाही, विधान परिषद आमदार पदाची अजुन शपथही घेतली नाही पण केवळ त्यांच्या विरोधात व्यक्तीद्वोषाने बदनामी करायची आणि समाजात नरेटिव्ह सेट करायचा हा विडा जणु काही माध्यमाच्या काही लोकांनी आणि चॅनेलवाल्यांनी हातात घेतला. सामाजिकदृष्ट्या योग्य नसुन वस्तुस्थिती जाणुन जर बातम्या दिल्या तर लोकही त्याचे स्वागत करतात. मंदिरात कुणी शेजारी भाविक भक्त उभा राहिले म्हणुन नेतृत्वाशी संबंध जोडणे हे देखील असत्यपणाचा कटेलोट असल्याचे कुलकर्णी यांनी म्हटलं.

## जाहीरनामा

### धारुर येथील श्रीमती नुतन सचिन कदम सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर धारुर

### किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२१५/२०२४

### समाबाई व इतर वि निरंक

मयताचे नाव : रामभाऊ पि. धोंडीबा वावळकर रा.कारी ता.धारूर जि. बीड हे दिनांक ०२/११/२०२३ रोजी मयत झाले आहेत. आणि त्यांचे वारस अर्जदार १. समाबाई भ्र. रामभाऊ वावळकर वय ६५ वर्षे, धंदा घरकाम रा. कारी ता. धारूर जि. बीड २. शिवाजी पिता रामभाऊ वावळकर वय ५० वर्षे, धंदा नौकरी रा. कारी ता. धारूर जि. बीड ३. बाईणाबाई भ्र. गंपू सोनवणे वय ४५ वर्षे, धंदा घरकाम रा. कवडगाव ता. वडवणी जि. बीड यांनी या न्यायालयास मयत रामभाऊ पि. धोंडीबा वावळकर रा.कारी ता.धारूर जि. बीड हे मयत झाले असून त्यांच्या पश्चात अर्जदारास शासकीय योजनेचा लाभ घेण्याकरीता, व इतर महत्त्वाच्या कामकाजाकरीता, अर्जदार यांना वारस प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज या न्यायालयाकडे केला आहे. त्यापेक्षा अर्जदार १ ते ३ सदरहु अर्जदार मयताचे वारस नव्हे असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत रामभाऊ पि. धोंडीबा वावळकर रा.कारी ता.धारूर जि. बीड यांचे वारसांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

**आज दिनांक : १५/०७/२०२४ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.**

**पुढील तारीख :१७/०८/२०२४**

स्वाक्षरित
धपाटे व्ही. व्ही.
क. लिपिक

(शिक्का)

आदेशावरून
स्वाक्षरित
**सहा.अधिक्षक**
दिवाणी न्यायालय क.स्तर, धारुर

# भूमि अभिलेख विभागाकडून शेतकऱ्यांना त्रास

## आ.संदीप क्षीरसागरांकडून शासनाकडे तक्रार

**बीड । प्रतिनिधी**

बीड मतदारसंघासह जिल्ह्यातून, भूमी अभिलेख विभागाकडून कामकाजासंबंधी अडवणूक आणि आर्थिक मागणी होत असल्याच्या तक्रारी शेतकरी आणि नागरिकांनी आ.संदीप क्षीरसागर यांच्याकडे केल्या होत्या. यावर आ.क्षीरसागर यांनी मा.मुख्यमंत्री, मा.मुख्य सचिव यांच्याकडे जिल्हा भूमी अभिलेख विभागाची तक्रार केली आहे. तसेच महसूल विभागाकडे अतारांकित प्रश्न विचारला आहे.

भूमी अभिलेख विभागाच्या अधिनस्त मोजणी, हद्द कायम, पोटहिस्सा, बिगरशेत, भू-संपादन, गुंठेवारी, कोर्ट कमिशन, जमीन प्रदान तसेच कालावधी नियमित, तातडी, अतितातडी, अतिअतितातडी अशा व इतर निकषपात्र प्रकारच्या जमीन मोजणी व त्यासंबंधीत कार्यवाही असलेली सर्व कामे केली जातात. दरम्यान बीड विधानसभा मतदारसंघ क्षेत्रातील बीड शहर, बीड तालुका व शिरूर का. तालुका तसेच जिल्ह्यातील शेतकरी व नागरिकांच्या, भूमी अभिलेख विभागाच्या कामकाजासंबंधी आ.संदीप क्षीरसागरांकडे अनेक तक्रारी आल्या होत्या. अधिकारी आणि कर्मचारी यांच्याकडून विभागासंबंधीत कामांसाठी जाणीवपूर्वक अडवणूक केली जाते, तसेच मोठ्या प्रमाणावर पैशांची मागणी केली जाते. अशा प्रकारच्या आ.क्षीरसागरांकडे शेतकरी व नागरिकांनी केल्या. यावर आ.संदीप क्षीरसागर यांनी मुख्यमंत्री, मुख्य सचिव, विभागीय आयुक्त, जमाबंदी आयुक्त व जिल्हाधिकारी यांच्याशी पत्रव्यवहार करून बीड जिल्हा भूमी अभिलेख विभागाची तक्रार केली आहे. तसेच अतारांकित प्रश्नाच्या माध्यमातून या विषयावर कार्यवाहीसाठी पाठपुरावा केला आहे.



### पीआर कार्ड बाबतही केला अतारांकित प्रश्न

गेल्या काही वर्षांपासून बीड शहरात पीआर कार्डच्या बाबत गोंधळ आहे. याबाबत आ.संदीप क्षीरसागर यांच्याकडे अनेक नागरिकांनी तक्रारी केल्या होत्या. यावर आ.क्षीरसागरांनी प्रशासकीय स्तरावर संबंधित अधिकार्यांच्या विरोधात कारवाई करण्याबाबत व सदरील प्रकार उघडकीस आणण्याबाबत पाठपुरावा केला होता. परंतु पीआर कार्डच्या विषयात अनेक तक्रारी असतानाही या अधिकार्यांनी संचिका गहाळ करणे, संबंधित कागदपत्राचे पुरावे नष्ट करणे, बोगस पीआर कार्ड तयार करणार्या खाजगी यंत्रणेशी हातमिळवणी करणे असे प्रकार केले आहेत. त्यामुळे नागरिकांची मोठी फसवणूक होत असल्याने आ.संदीप क्षीरसागर यांनी या मुद्द्यावरही महसूल मंत्रालयाकडे अतारांकित प्रश्नाद्वारे जाब विचारला आहे.

# 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण राज्य सरकारची महत्वकांक्षी योजना -राजेंद्र मस्के

### संघर्षयोद्धा भाजपा जनसंपर्क कार्यालयात सुविधा केंद्राचा शुभारंभ

### ऑनलाईन फॉर्म भरण्यासाठी महिलांच्या लागल्या रांगा ..!



बीड य प्रतिनिधी )

मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना ही राज्य सरकारची महत्वकांक्षी योजना असून, राज्यातील महिलांना आर्थिक स्वातंत्र्य आणि त्यांच्या आरोग्य आणि पोषणात भरीव सुधारणा करणारी योजना आहे. या योजनेचा लाभ सर्व पात्र महिलांपर्यंत पोहचवण्यासाठी भारतीय जनता पार्टीचा कार्यकर्ता तत्पर असून, या योजनेचे फॉर्म महिलांना सुलभपणे व विना खर्चात भारता यावेत. यासाठी आपला भाऊ आपल्या सेवेत या संकल्पनेतून विनामुल्य फॉर्म सेवा सुविधा केंद्र सुरु केले असून, बहुसंखे महिलांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन राजेंद्र मस्के यांनी केले आहे.

आपला भाऊ आपल्या सेवेत या संकल्पनेतून भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी व भाजपा कामगार मोर्चाच्या वतीने मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना व घरेलू महिला कामगार नोंदणी फॉर्म या योजनांचे मोफत ऑनलाईन फॉर्म सेवा सुविधा केंद्राचा शुभारंभ संघर्षयोद्धा भाजपा जनसंपर्क कार्यालय, नगर रोड बीड येथे भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ शिराळे, लाडकी बहिण योजना प्रभारी ओमप्रकाश गिरी, मराठवाडा कामगार मोर्चा अध्यक्ष दादासाहेब नन्नवरे, उपाध्यक्ष लालासाहेब पन्हाळे, आत्माराम पवार, प्रदेश कार्यकारणी सदस्या अनिता जाधव, डॉ. जयश्रीताई मुंडे, छायाताई मिसाळ, रंजनाताई दराडे, गोवर्धन दराडे, बालाजी पवार, गणेश बप्पा उगले, कैलास काटे, रावसाहेब मस्के यांच्यासह शेकडो महिलांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

राज्याचे मुख्यमंत्री ना. एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस, ना. अजित दादा पवार ◀◀ पान ३ वर

# ना.धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त डोळ्यांच्या रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया

### रा.काँ.चे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश, डॉ.सारिका क्षीरसागरांचा दूर'दृष्टी' उपक्रम



**बीड । प्रतिनिधी**

कृषिमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर व कल्पतरूच्या सचिव डॉ.सारिका क्षीरसागर यांच्या पुढाकारातून डोळ्यांच्या रुग्णांवर उपचार करण्यात येणार आहेत. क्षीरसागरांच्या दूर'दृष्टी' नियोजनामुळे अनेक रुग्णांना चष्म्याची गरजही भासणार नसून या अभिनव उपक्रमाचे सर्वस्तरातून कौतूक करण्यात येत आहे.





कृषिमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यात अनेक सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. बीडमध्ये डॉ.योगेश आणि डॉ.सारिका क्षीरसागर यांच्या पुढाकारातून चष्मा असलेल्या रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत. यामुळे रुग्णांना परत चष्मा लावण्याची ◀◀ पान ३ वर

# श्री अश्वलिंग विद्यालयाच्या विद्यार्थ्यांची वारकरी दिंडी संपन्न

**पिंपळवंडी । प्रतिनिधी**

पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील श्री.अश्वलिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापक व शिक्षकांनी या वर्षी आगळावेगळा उपक्रम राबवून आषाढी एकादशी प्रित्यर्थ दि.१६ जुलै २०२४ मंगळवार रोजी विद्यार्थ्यांची पायी दिंडी सोहळ्याचे आयोजन केले होते. आषाढी वारी निमित्त महाराष्ट्रातील सर्वच पायी दिंड्या पंढरीच्या पांडुरंगाच्या भेटीसाठी पंढरपुरात पोहचल्या आहेत.हातात भगवी पताके,टाळ मृदंगाच्या गजरात आणि ज्ञानोबा माऊली तुकाराम व विठुरायाच्या भजनाच्या नाम घोषात ही दिंडी शाळेपासून गावातील प्रमुख रस्त्यावरून गावात काढण्यात आली होती.यावेळी विद्यार्थी-विद्यार्थ्यांनी वारकऱ्यांची वेशभूषा परिधान केली होती.डोक्यावर तुळशीवृंदावनचाही समावेश होता.या दिंडीचे ठिकठिकाणी महिलांनी स्वागत केले.शिक्षक व विद्यार्थ्यांनी फुगडीचा आनंद लुटला.या पायी दिंडीत इयत्ता ५ वी ते १२ पर्यंतचे सर्व विद्यार्थी-विद्यार्थिनी सह मुख्याध्यापक भोसले सर तसेच तोतरे सर,जरे सर,शिंदे सर,बडे सर,अभिषेक पवार सर,प्रा.तरटे सर,प्रा.बोडखे सर,प्रा.अशोक पवार सर,प्रा.शाम पवार सर,प्रा.वाघुले सर.श्रीमती ठाणगे मॅडम,शेखर पवार,जानू मामा,अशोक मामा,सुरेश पवार,वाळके मामा सहभागी झाले होते.



# उषा विर्धे यांचे निधन

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

येथील विवेकानंद नगर परळी रोडच्या ज्येष्ठ नागरिक सौ उषा अशोक विर्धे यांचे आळंदी ते पंढरपूरच्या दिंडीच्या पायी वारीत असताना लोणंद जवळील एका खाजगी रुग्णालयात हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले मृत्यू समयी त्या ६४ वर्षांच्या होत्या.



याबाबत सविस्तर माहिती अशी की, पुणे येथील डेक्कनच्या खंडोबा दर्शन दिंडी क्रमांक दोन मधून सौ उषा विर्धे, त्यांचे पती अशोक विधे आणि नातेवाईक हे आळंदी ते पंढरपूर या दिंडीमध्ये पाई वारी करत होते .माळशिरस येथे दिंडी आली असता त्या आजारी पडल्या, त्यांना लोणंद येथील साई हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केले असता तेथे त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आल्याने त्यांचे निधन झाले .

त्यांच्या पश्चात त्यांचे पती , अशोक विर्धे दोन विवाहित मुल, विवाहित मुलगी आणि नातवंडे असा परिवार आहे.

श्रीयुत अशोक विर्धे जलसंपदा विभागातील सेवानिवृत्त कर्मचारी आहेत. उषा विर्धे यांच्या पार्थिवावर अंबाजोगाई येथील रविवार पेठ येथील बोरुळ तलावाच्या स्मशानभूमीत १४ जुलै रोजी रविवारी अंत्यसंस्कार करण्यात आले. याप्रसंगी विविध क्षेत्रातील नागरिक आणि नातेवाईक उपस्थीत होते. सौ. उषा विरधे यांच्या निधनामुळे सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

# ग्रामीण रूग्णालयाकडे जाणाऱ्या रस्त्याची दुरावस्था तात्काळ दुरूस्तीची मागणी नसता आंदोलनाचा इशारा

**किल्लेधारुर । प्रतिनिधी**

धारूर येथील ग्रामीण रुग्नालया कडे जाणा-या रस्त्याची प्रचंड दुरावस्था झाली असून या रस्तत्याने गाडी चालवणे सोडा पायी जाणे येणे मुश्कील झाल्याने रुग्नाना व रुग्नाचे नातेवाईकाना अनेक समस्याना तोड द्यावे लागत आहे त्यामुळे तात्काळ हा पुर्ण रस्ता सिंमेट रस्ता करावा आशी मागणी या भागातील युवक सामाजीक कार्यकर्त कैलास बोरगावकर व नागरीकानी केली आहे

धारूर ग्रामीण रुग्नालय हे धारूर ग्रामिण मध्ये असून ग्रामीण रुग्नालया कडे जाणारी येणारी नागरीकाची संख्या मोठी आहे रुग्न वाहीणी व गंभिर रुग्नाला याच रस्त्याने ने आण करावी लागते सभाजीनगर धारूर ग्रामीण मधील

श्री हनूमान मंदीर ते ग्रामीण रुग्नालय या रस्त्याची प्रचंड दुरावस्था झाली असून या रस्त्या वर सर्वत्र खड्डेचे साम्राज्य झाले असून पावसाळ्यात साचणारे पाण्या मुळे दुचाकी चारचाकी वाहण चालवणे मुश्कील होते. पायी चालताना पादचारी रुग्नाला व सोबतचे नातेवाईकाला चालणे मुश्किल होते खड्डा चुकवताना पाणी कधी अंगा वर येईल उडेल हे सांगणे मुश्कील रुग्नाना अनेक समस्याना तोंड द्यावे लागते वारंवार मागणी करून ही या रस्ता दुरूस्ती कडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे रुग्नाची व नातेवाईकाची गैरसोय टाळण्या साठी व गंभिर रुग्नाचे प्राण वाचवण्या साठी तात्काळ या रस्त्याची दुरूस्ती करावी व पुर्ण रस्त्याचे सिंमेट रस्ता करावा आशी मागणी या भागातील सामाजीक कार्यकर्ते कैलास बोरगावकर यांनी केली आहे.

# अहमदपूर राष्ट्रीय महामार्ग ठरतोय अपघाताचे केंद्र

### संबंधित महामार्गाचे अधिकारी यांनी लक्ष देऊन योग्य त्या उपाययोजना करावयात- अँड.मनोज संकाये

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

वाहतूक महामार्ग हे प्रत्येक देशाचे ओळख असते. जे रस्ते चांगले असले की वाहतुकीस अडथळा निर्माण होत नाही. अहमदपूर राष्ट्रीय महामार्ग हा अपघाताचे केंद्र बनत चालला आहे. पिंपळा धायगुडा पासून १०० मीटर अंतरावर या महामार्गावर असंख्य मोठे खड्डे आहेत. काही रस्ता पूर्ण आहे तर काही ठिकाणी खड्डे पडले आहेत त्यामुळे तेथे अपघाताचे प्रमाण वाढवून दोन ते तीन जणांना आपले प्राण गमवावे लागले आहेत. या गोष्टीचा गांभीर्यपूर्वक राष्ट्रीय महामार्गाच्या अधिकाऱ्यांनी विचार करण्याची गरज आहे. अपघात होऊ नये म्हणून त्वरित उपाययोजना राबवाव्यात अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते अँड.मनोज संकाये यांनी राष्ट्रीय महामार्गाच्या संबंधित अधिकाऱ्यांकडे केली आहे.



या राष्ट्रीय महामार्गावरून अहमदपूर नांदेड लातूर या मार्गाकडे मोठी जाड वाहतूक करणारी वाहने तसेच परिसरातील आणि अंबाजोगाई कडे येणाऱ्या वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. या महामार्गावर झालेले रोडचे काम एक बाजू पूर्ण असून दुसरी बाजू अर्धवट आहे. २०२० पासून या महामार्गाचे काम रखडले असून तेथील नागरिक काम पूर्ण होण्याच्या प्रतीक्षेत आहेत. महामार्गावर असलेले खड्डे हे अतिशय मोठे आहेत त्याचे काम अर्धवट आहे त्यामुळे वाहनधारकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. वाहनधारकांना या खड्ड्यातून जाताना तारेवरची कसरत करावी लागते. अनेक वाहनधारक तसेच मोठे वाहनांचा येथे अपघात घडल्याच्या घटना समोर आल्या आहेत. या खड्ड्यातून वाहन चालवताना समोरचे वाहन दिसत नसल्यामुळे सुद्धा अपघात झाले आहेत त्यामुळे नागरिकांच्या जीवाशी न खेळता राष्ट्रीय महामार्गाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी लक्ष घालून तसेच अपघात होऊ नये म्हणून योग्य त्या उपाययोजना राबवाव्यात अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.



**माजलगाव:- येथील माहेश्वरी शिक्षण प्रसारक संस्था माजलगाव जिल्हा बीड़ संचालित राजस्थानी शिशुविहारच्या वतीने दि १६ जुलै मंगळवार रोजी बाल विद्यार्थीची आषाढ़ी एकादशी निमित्त दिंडीचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी बालकांचे कौतुक करुन शुभारंभ करताना संस्था सचिव रामानंद लड्डा व शिक्षिका यांची उपस्थिती होती.**

# अखेर वडझरी आश्रम शाळेच्या मुख्याध्यापकपदी प्रवीण वनवे यांच्या निलंबनानंतर श्रीमती विनिता भीमराव बांगर यांची नियुक्ती

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा तालुक्यातील वडझरी येथील मातोश्री सेवाभावी संस्था संचलित संत शिरोमणी भगवान बाबा प्राथमिक आश्रम शाळेतील शालेय पोषण आहार योजनेतील अनियमितता व गैरव्यवहार शैक्षणिक वर्ष सन २०१८-१९,२०१९-२०,२०२०-२१ कालावधीत प्रकरणात सदरील शाळेतील कर्मचारी धनंजय सानप आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी शिक्षण विभागाकडे तक्रार केली होती.त्या अनुषंगाने शिक्षण विभाग जिल्हा परिषद बीड यांच्या स्तरावरून चौकशी करून अहवाल सादर केल्यानंतर संबंधित मुख्याध्यापक प्रवीण लिंबाजी वनवे यांना निलंबित करण्याचे आदेश दि.०५ जुन २०२४ रोजी कक्ष अधिकारी महाराष्ट्र शासन अजित जगताप यांनी दिले होते.त्या अनुषंगाने

सदर शाळेतील सेवाजेष्ठता यादीनुसार मुख्याध्यापक म्हणून मान्यता मिळण्याबाबतचे पत्र सहाय्यक आयुक्त संचालक इतर मागास बहुजन कल्याण बीड यांनी प्रादेशिक उपसंचालक इतर मागास बहुजन कल्याण प्रादेशिक विभाग छत्रपती संभाजी नगर यांना पत्र क्र. ८१२ दि. ११ जुलै २०२४ च्या पत्रानुसार कळविले होते. त्या पत्रानुसार प्रादेशिक उपसंचालक इतर मागास बहूजन कल्याण प्रादेशिक विभाग छत्रपती संभाजीनगर यांनी श्रीमती विनिताबाई भीमराव बांगर यांना शाळेचे प्रशासकीय व दैनंदिन कामकाज सुरळीत चालवण्यासाठी त्यांचे मूळ कामकाज सांभाळून अतिरिक्त मुख्याध्यापक पदाचा कार्यभार दिनांक १५.१०.२०२४ पर्यंत देण्यात आलेला आहे. तदनंतर संस्थेच्या आश्रम शाळेतील सेवा जेष्ठ शिक्षकाचा कायम मुख्याध्यापक पदाचा परिपूर्ण प्रस्ताव प्रादेशिक उपसंचालक इतर मागास बहुजन कल्याण प्रादेशिक विभाग छत्रपती संभाजीनगर या कार्यालयात सादर करण्यात यावा. असे आदेश प्रादेशिक उपसंचालक यांनी दिनांक १५ जुलै २०२४ रोजी सहाय्यक संचालक इतर मागास बहूजन कल्याण बीड यांना दिलेले आहेत. याप्रकरणी शाळेतील सहशिक्षक धनंजय सानप व त्यांच्या सहकाऱ्यांनी शासन दरबारी वारंवार पाठपुरावा केला होता.अखेर निलंबित मुख्याध्यापक प्रवीण वनवे यांच्या जागी श्रीमती विनिता बांगर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

# वैयक्तिक लाभार्थ्यांना तीन दिवसात पैसे द्या अन्यथा ग्रामपंचायतचे खाते होल्ड करू

### धोंडराई रोहयो बाबत जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश -ॲड. अजित देशमुख यांची माहिती

**बीड । प्रतिनिधी**

धोंडराई तालुका गेवराई येथील तीनशे गायगोठे आणि चारशे विहिरीसह इतर कामातील भ्रष्टाचार आणि गैरकारभार जनआंदोलनाने उघडकीस आणला. त्याला लागून गेवराईतील अन्य अनेक गावातील घोटाळे देखील समोर आले. यावर आज जिल्हाधिकारी अविनाश पाठक आणि अँड. अजित देशमुख यांची बैठक झाली. बैठकीत जिल्हाधिकाऱ्यांनी ही गंभीर बाब लक्षात घेतली. गेवराई तालुक्यातील ग्रामपंचायतींनी तीन दिवसात लाभार्थ्यांच्या खात्यात पैसे वर्ग करा अन्यथा ग्रामपंचायतचे खाते होल्ड करू, असे आदेश निर्गमित केले. हे आदेश फक्त धोंडराई पुरते मर्यादित नसून गेवराई तालुक्यातील सर्व गावांसाठी आहेत, अशी माहिती जन आंदोलनाची विश्वस्त अँड.अजित एम. देशमुख यांनी दिली आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत वैयक्तिक लाभाची जेवढी कामे आहेत, त्याचे कुशल आणि अकुशल असे दोन्ही प्रकारचे देयके लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्याचे आदेश आहेत. मात्र असे होत नव्हते. त्यामुळे तक्रार प्राप्त झाल्यानंतर जन आंदोलनाने ही बाब सातत्याने लाऊन धरली. आज या मुद्द्यावर बैठक झाली. या बैठकीमध्ये कठोर कारवाई करण्याचा निर्णय जिल्हाधिकारी यांनी घेतला. लाभार्थ्यांच्या खात्यात पैसे जमा होणे आवश्यक आहे. गेवराई तालुक्यात धोंडराईसह अन्य अनेक गावांमध्ये हा प्रकार घडलेला असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे सर्वांवर टांगती तलवार आहे. मनरेगाचे पैसे आयुक्तांकडून मागवतानाच ते ग्रामपंचायतच्या खात्यातुन थेट लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करणे आवश्यक असते. मात्र तसे न करता हे पैसे ग्रामपंचायतीच्या खात्यात मागवण्यात आलेले आहेत. ग्राम पंचायतनेच हे पैसे उचचले आहेत. लाभार्थ्यांचे व्हेंडर तयार केलेच नाहीत. नियमाने हे तयार व्हायला पाहिजे होते. तालुक्यात आता अनेक ठिकाणी पळवटा शोधण्याची काम चालू होईल. मात्र संपूर्ण कागदपत्र तयार आहेत. त्यामुळे गटविकास अधिकाऱ्यांनी आणि संबंधित यंत्रणेने कुठलीही बनवाबनवी करू नये. अन्यथा त्यांना महागात पडेल. लाभार्थ्यांनी देखील पैसे मिळाले असे लिहून देऊ नये. कारण काम झालेले नाही, हे त्यांनी लक्षात घ्यावे. आपले पूर्ण पैसे घ्यावेत, अन्? काम देखील व्हावे,. यातच लाभार्थ्यांचे हित आहे. लिहून देवून आजचा ग्राम पंचायतीची प्रश्न सुटेल. पण कामाची तपासणी झाली तर सुट्टी नाही, असा इशाराही देशमुख यांनी दिला आहे .

दरम्यान एका गावाचे उदाहरण समोर आणत आपण तालुक्यातील कारभार समोर आणला आहे. असाच कारभार जिल्ह्यात असल्याने जिल्ह्याला वळण लावण्याचे काम धोंडराईच्या माध्यमातून ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
बुधवार दि.१७ जुलै २०२४ । पान ७

# आता, मसुरीत काय होणार, पूजा खेडकरांची निवड रद्द होणार का?

पुणे । प्रतिनिधी

प्रशिक्षणार्थी आयएएस पूजा खेडकर यांच्या आयएएस होण्यासाठीचे अनेक कारनामे समोर आल्यानंतर आता त्यांच्याविरुद्ध कारवाईला सुरुवात झाल्याचं दिसून येत आहे. कारण, पूजा खेडकर यांचा जिल्हा प्रशिक्षण कार्यक्रम स्थगित करण्याचे आदेश महाराष्ट्र शासनाने दिले आहेत. तर, मसुरीतील लाल बहादूर शास्त्रीय प्रशासकीय अकादमीमध्ये त्यांना परत बोलवण्यात आले. या प्रशिक्षण संस्थेने दिलेल्या निर्देशानुसार महाराष्ट्र शासनाने ही कारवाई केली आहे. त्यामुळे, पूजा खेडकर यांचा पाय आणखी खोलात गेल्याचं आता स्पष्ट झालं आहे. दुसरीकडे खेडकर कुटुंबीय पुण्याच्या बाणेरमधील बंगल्याला कुलूप लावून पळून गेले आहेत. तर,



दुसरीकडे पूजा खेडकर यांची परतवारी सुरू झाल्याचं दिसून येत आहे. आता, याबाबत माजी सनदी अधिकारी अविनाश धर्माधिकारी यांनीही भूमिका मांडली आहे. तसेच, यापूर्वी दोन जणांची निवड रद्द झाल्याची माहितीही त्यांनी दिली.

पूजा खेडकर यांच्या अपंग आणि दिव्यांग प्रमाणपत्राचे प्रकरण गंभीर आहे, आणि या गांभीर्याने सरकार पुढचे पाऊल उचलत आहे. विशेष म्हणजे भारतीय प्रशासकीय सेवेत पूजा खेडकर अजून कायम झालेल्या नाहीत, त्यांचे अद्याप प्रशिक्षण सुरू आहे. त्यामुळे, राज्य सरकारने जे पाऊल उचलले आहे, ते योग्य आहे, असे अविनाश धर्माधिकारी यांनी म्हटलं आहे. तसेच, याप्रकरणात कोणताही दबाव येऊ नये, दूध का दूध पानी का पानी व्हायला पाहिजे, अशी मागणीही धर्माधिकारी यांनी व्यक्त केली. केंद्र सरकार आणि लाल बहादूर शास्त्री अकादमी यांनी हा तपास एका प्रकरणासाठी न ठेवता इतरांनी सुद्धा कोणी नियमांचा गैरफायदा घेतला नाही ना, हे देखील तपासून घेतलं पाहिजे. तसेच, याप्रकरणी कठोरपणे तपास झाला नाही तर व्यवस्थेला तडा जाईल. बोगस प्रमाणपत्रासंदर्भातील आरोप सिद्ध झाल्यास पूजा खेडकर यांच्यावर गंभीर कारवाई होऊ शकते, भारतीय प्रशासकीय सेवेत निवड रद्द झालेली याआधीची २ प्रकरणे होऊन गेलेली आहेत, अशी माहितीही अविनाश धर्माधिकारी यांनी दिली. पूजा खेडकर यांना आता मुसरीत परत बोलवण्यात आले आहे. त्यामुळे, लाल बहादूर शास्त्री अकादमीमध्ये दाखल झाल्यानंतर पूजा खेडकर यांना विविध प्रश्न विचारले जातील, तसेच कागदपत्रे सादर करावे लागतील, असे धर्माधिकारी यांनी सांगितले. तसेच, जो कोणी खोटं प्रमाणपत्र देत असेल तर त्याच्यावर सुद्धा कारवाई झाली पाहिजे, अशी माहितीही त्यांनी दिली.

### निलंबनाची कारवाई होऊ शकते

वादग्रस्त अधिकारी पूजा खेडकर यांना वाशीम येथील प्रशिक्षण तात्काळ थांबवण्यास सांगितला असून त्यांना मसुरीत २३ जुलै पर्यंत बोलवण्यात आलं आहे, पूजा खेडकर यांच्या दिव्यांग प्रमाणपत्रावरुन तसेच त्यांच्या मातोश्री मनोरा खेडकर यांनी शेतकऱ्याला दाखवलेल्या पिस्तुलच्या व्हिडिओमुळे हे प्रकरण गाजलं होतं. त्याचबरोबर त्यांची बेहिशोबी मालमत्तेची देखील चर्चा होत आह, अखेर त्यांचं जे प्रशिक्षण थांबवण्यात आलं असून त्यांच्यावर निलंबनाची कारवाई होऊ शकते, असं आरटीआय कार्यकर्ते विजय कुंभार यांनी म्हटलं आहे

# 'एमआयटी एडीटी'च्या भाग्यश्रीला राष्ट्रीय रोइंगमध्ये कांस्य

पुणे । प्रतिनिधी

पंजाबमधील मोगा येथे झालेल्या ७व्या राष्ट्रीय इनडोइअर रोइंग अजिंक्यपद स्पर्धेत येथील एमआयटी आर्ट, डिझाईन व टेक्नॉलॉजी विद्यापीठाच्या डॉ.विश्वनाथ कराड क्रीडा अकादमीची खेळाडू भाग्यश्री घुले हिने महिलांच्या एलडब्ल्यू१ई प्रकारात कांस्य पदकाची कमाई करत विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे.

यासह या स्पर्धेच्या विविध गटात सहभागी झालेल्या अन्य खेळाडूंनी राष्ट्रीय स्तरावर कडवी झुंज देत अत्यंत कौतुकास्पद कामगिरी केली आहे. अभिमानाची गोष्ट म्हणजे, पुरुषांच्या खुल्या एम१ई गटात स्पर्धा केलेल्या प्रा.आदित्य केदारी यांनी एकंदर चौथे स्थान प्राप्त करत भारतीय संघात स्थान मिळविले आहे. केदारी हे सध्या विद्यापीठाच्या 'स्कुल ऑफ लॉ'मध्ये सहाय्यक प्राध्यापक पदावर कार्यरत आहेत.





### प्रा.आदित्य केदारींची भारतीय संघात निवड; विद्यापीठाच्या अन्य खेळाडूंची स्पर्धेत कडवी झुंज

यासह, केदारी, स्नेहा सोळंकी, योगेश बोरोले आणि भाग्यश्री घुले यांचा समावेश असलेल्या खुल्या मिश्र४ई गटातील संघाने कडवी झुंज दिली, मात्र अगदी थोड्या फरकाने पदक हुकल्याने त्यांना चौथ्या स्थानावर समाधान मानावे लागले. मुलांच्या दुहेरी सबज्युनियर गटात प्रथमेश कांदे व श्रेयस गर्जे यांनाही थोड्या फरकाने पदकाला मुकावे लागले. त्यांनीही या गटात चौथे स्थान पटकाविले. यासह एलएम१एक्स४ई, कनिष्ठ महिला ४ई, सब ज्युनिअर पुरुष एकेरी गटात एमआयटी एडीटी विद्यापीठाच्या खेळाडूंनी चांगले आव्हान देत अनुक्रमे ७वा, ९वा आणि ८ क्रमांक प्राप्त केला.

या कामगिरीनंतर विद्यापीठाचे कार्याध्यक्ष तथा कुलगुरू प्रा.डॉ.मंगेश कराड, कार्यकारी संचालक प्रा. डॉ.सुनीता कराड, प्र.कुलगुरू डॉ.अनंत चक्रदेव, डॉ.मोहित दुबे, डॉ.रामचंद्र पुजेरी, कुलसचिव डॉ.महेश चोपडे, क्रीडा विभाग संचालक प्रा.पद्माकर फड, विद्यार्थी कल्याण विभागाचे सहाय्यक संचालक डॉ.सुराज भोयार यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले आहे.

# पुणे जिल्हाधिकाऱ्यांनी छळ केला

### वादग्रस्त आयएएस अधिकारी पूजा खेडकर यांचा गंभीर आरोप

पुणे । प्रतिनिधी

सनदी अधिकारी पूजा खेडकर प्रकरणात मोठी अपडेट समोर आली आहे. पूजा खेडकर यांनी वाशिम पोलिसांकडे थेट पुण्याचे जिल्हाधिकारी सुहास दिवे यांच्यावर छळ केल्याचा आरोप केला आहे. या प्रकरणात जिल्हाधिकाऱ्यांवर केलेल्या आरोपामुळे मोठी खळबळ उडाली आहे.

राज्यासह देशभर चर्चेत असलेल्या वादग्रस्त ख-ड अधिकारी पूजा खेडकर यांना मोठा धक्का बसला आहे. उत्तराखंडमधील मसुरी येथील लाल बहादूर शास्त्री राष्ट्रीय प्रशासन अकॅडमीने महाराष्ट्रातून पूजा खेडकरचा प्रशिक्षण थांबवलं आहे. अशातच या प्रकरणामध्ये आता मोठी अपडेट समोर आली आहे. पूजा खेडकर यांनी पुण्याचे जिल्हाधिकारी सुहास दिवे यांच्यावर छळ केल्याचा आरोप केला आहे. पुजा खेडकर पुण्यामध्ये प्रशिक्षणार्थी म्हणून होत्या मात्र तात्काळ त्यांची बदली वाशिम येथे करण्यात आली होती. प्रमाणपत्रांवरून आरोप होत असताना पूजा खेडकर यांनी पुणे जिल्हाधिकारी सुहास दिवे यांच्यावर छळाचा आरोप केल्याने मोठी खळबळ उडाली आहे. सोमवारी रात्री ११ च्या सुमारास वाशिम पोलीस पूजा खेडकर यांच्या शासकीय विश्रामस्थळी पोहोचले होते. त्यावेळी पोलिसांकडे त्यांनी पुणे जिल्हाधिकारी सुहास दिवे यांच्यावर छळ केल्याचा आरोप केला. यावेळी वाशिम पोलिसांनी तक्रारीची नोंद केली असल्याची माहिती सूत्रांकडून समजते आहे.

# सुनेत्रा पवार मोदीबागेत कशासाठी गेल्या होत्या?

### अजितदादा गटाकडून तातडीने स्पष्टीकरण

पुणे । प्रतिनिधी

छगन भुजबळ यांनी सोमवारी शरद पवार यांची भेट घेतल्यानंतर राजकीय वर्तुळात खळबळ उडाली होती. अशातच मंगळवारी अजित पवारांच्या पत्नी आणि राज्यसभेच्या नवनिर्वाचित खासदार सुनेत्रा पवार पुण्यातील मोदीबागेत पोहोचल्याने राजकीय वर्तुळाला दुसरा धक्का बसतो की काय, असे वाटत होते. त्या अचानक शरद पवारांच्या भेटीला का पोहोचल्या, असा प्रश्न अनेकांना पडला होता. मात्र, सुनेत्रा पवार या मोदी बागेत शरद पवार यांच्या भेटीला गेले नसल्याचे समोर आले आहे. याबाबत अजित पवार यांच्या युवक राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण यांनी तातडीने स्पष्टीकरण दिले आहे. सुनेत्रा पवार नीता पाटील यांना भेटायला गेल्या होत्या. अजित पवारांची बहीण नीता पाटील मोदीबागेत बी विंग मध्ये पाचव्या मजल्यावर राहतात. त्यांना भेटण्यासाठी सुनेत्रा पवार गेल्या होत्या, असे सुरज चव्हाण यांनी सांगितले.

सुनेत्रा पवार यांनी बारामती लोकसभा मतदारसंघाची निवडणूक सुप्रिया सुळे यांच्या विरोधात लढवली होती. या निवडणुकीत सुप्रिया सुळे यांनी सुनेत्रा पवार यांचा पराभव केला होता. यानंतर अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून सुनेत्रा पवार यांना राज्यसभा निवडणुकीत उमेदवारी देण्यात आली होती. सुनेत्रा पवार यांची खासदारपदी बिनविरोध निवड झाली होती. या सर्व घटनाक्रमानंतर सुनेत्रा पवार आज खासदार झाल्यानंतर पहिल्यांदा पुण्यातील शरद पवार यांचं निवासस्थान असलेल्या मोदीबागेत दाखल झाल्या होत्या. सुनेत्रा पवार मोदी बागेमध्ये दाखल झाल्या तेव्हा शरद पवार, सुप्रिया सुळेदेखील उपस्थित होत्या. त्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले होते.

# पुण्यात अल्पवयीन पोरी पार्टीत झिंगल्या, नशेत १६ वर्षांच्या मुलीचा गळफास

पुणे । प्रतिनिधी

पुण्यातील येरवडा परिसरात दोन अल्पवयीन तरुणींच राहत्या घरात दारुपार्टी केली. मद्यप्राशन केल्यावर एका तरुणीने आत्महत्या दुसरी बेशुद्ध अवस्थेत आढळली. तरुणीच्या आत्महत्येचं कारण अस्पष्ट आहे. या घटनेचा पोलीस तपास सुरू आहे. पार्टी करणाऱ्या मुली अल्पवयीन असल्याची माहिती मिळत आहे. येरवडा भागातील धक्कादायक घटनेने संपूर्ण पुणे शहर हादरले आहे. आत्महत्या केलेल्या मुलीचे वय १६ आहे. येरवडा पोलीस ठाण्यात आकस्मित मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मयत तरुणी ११ वी मध्ये असून येरवडा भागात होती. सोमवारी सायंकाळी ती आणि तिच्या एका मैत्रिणीने आई भाजी आणण्यासाठी गेली असता घरात दारू पार्टी करायचे ठरवले आणि मद्यप्राशन केले. दरम्यान, मयत तरुणीच्या मैत्रिणीने त्याच भागात राहणाऱ्या एका तरुणाला रात्री ८ वाजता बोलावले होते. तो तरुण घरी पोहचताच त्याने एक तरुणी ओढणी वापरून गळफास लावलेल्या अवस्थेत त्याने पाहिले. यानंतर त्यानेच तिच्या आईला बोलवून आणले. त्यांनी तिला रुग्णालयात दाखल केले. परंतु, त्यापुर्वीच तिचा मृत्यू झालेला होता. मृत तरुणीची दुसरी मैत्रीण बेशुद्ध अवस्थेत आढळून आली. तिच्या तोंडावर पाणी मारून उठवले, तेव्हा ती दारूच्या नशेत असल्याचे निष्पन्न झाले. तिला देखील ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. पोलिसांनी पाहणी केली असता या दोघींनी दारू पार्टी केल्याचे समोर आले आहे. दारू पार्टीनंतर त्यांनी उलट्या देखील केल्याचे पोलिसांनी सांगितले. मात्र या तरुणीने आत्महत्या का केली हे अद्याप समजू शकलेले नाही.

# पवारांनी घेतली 'या' जुन्या सहकाऱ्याची भेट, कित्येक वर्षांच्या भेटीने डोळ्यात तरळले अश्रू

पुणे । प्रतिनिधी

मंगळवारी दुपारी बारा वाजताची वेळ. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष व ज्येष्ठ नेते शरद पवार कमला नेहरू पार्कजवळील खासगी रूग्णालयात जवळच्या नातेवाईकांना भेटण्यासाठी गेले होते. तेव्हा, आपल्या पक्षाचे जुने नेते तेथेच ॲडमिट असल्याचे त्यांना कळले.

काही वेळातच पवार यांची पावले त्यांच्या दिशेने वळली. दस्तुरखुद्द शरद पवार साहेब' हेच आपल्या भेटीसाठी आल्याने त्या जुन्याजाणत्या नेत्याच्या डोळ्यात अक्षरशः आनंदाश्रू तरळले. पवार यांनीही या नेत्याला आजारातुन लवकर बरे होण्याच्या शुभेच्छा देत त्यांच्याशी संवाद साधला.

महाराष्ट्रातील खेड्यापाड्यातील सर्वसामान्य कार्यकर्त्यालाही नावानिशी ओळखणारे व्यक्तीमत्व म्हणून शरद पवार यांची ओळख आहे. कोणतीही निवडणुक असो, किंवा मोठी सभा आपल्या जुन्याजाणत्या नेत्यांना, कार्यकर्त्यांना, ओळखीच्या माणसांना वेळात वेळ काढून आवर्जुन भेटणे, त्यांच्याशी संवाद साधण्याची किमया ते आजही साधतात.

त्याच्या चर्चाही सगळीकडे ऐकायला मिळतात. मंगळवारी रूग्णालयात उपचार घेणाऱ्या पुण्यातील एका नेत्याला साहेबांच्या अनपेक्षित भेटीचा दुग्धशर्करा योग साधता आला. पवार हे मंगळवारी दुपारी पावणे बारा वाजता कमला नेहरू पार्क परिसरातील खासगी रूग्णालयात त्यांच्या जवळच्या नातेवाईकांना भेटण्यासाठी आले होते.

त्याचवेळी तेथे भेटलेल्या ॲड.निलेश निकम यांची विचारपुस करताना त्यांचे वडील व माजी उपमहापौर ॲड.एन.टी.निकम यांच्यावर तेथेच उपचार सुरू असल्याचे पवार यांना समजले. काही वेळाने पवार हे थेट ॲड.एन.टी.निकम यांच्या खोलीत दाखल झाले.

त्यांनी ॲड.निकम यांची आस्थेवाईकपणे चौकशी केली. तब्येतीची काळजी घेण्याचा सल्लाही त्यांनी दिला. खुद्द पवार साहेब आपल्या भेटीला आल्याचे पाहून ॲड.निकम यांच्या डोळ्यात अक्षरशः आनंदाश्रू तरळले. या अनपेक्षित व काही क्षणाच्या भेटीने ॲड.निकम यांना बळ तर मिळालेच, त्याशिवाय पवार यांच्या कार्यकर्त्यांशी असणाऱ्या ऋणानुबंधाची प्रचिती आली.

# माझ्यावर टीका करताय, पण तुम्ही किल्ल्यांसाठी निधी दिला का? ;संभाजीराजेंचा मंत्र्यांना थेट सवाल

पुणे । प्रतिनिधी

विशाळगडावरील अतिक्रमणाच्या मुद्द्यावरून सध्या वाद पेटला आहे. असं असतानाच संभाजीराजे छत्रपती यांनी पुण्यात पत्रकार परिषद घेतली. तेव्हा बोलताना संभाजीराजे छत्रपती यांनी वैद्यकीय शिक्षण मंत्री आणि कोल्हापूरचे पालकमंत्री हसन मुश्रीफ यांना थेट सवाल केला आहे. जातीच वळण याला देऊ नये अशी सर्व नेत्यांना विनंती मी प्रामाणिक पणे काम करत आहे, गड अतिक्रमण मुक्त झाले पाहिजे हीच अपेक्षा आहे. जे विशाळगडावर केलं ते राज्यातील इतर किल्ल्यावर देखील करावं ही मुख्यमंत्री



महोदयांना विनंती आहे. हसन मुश्रीफ माझ्यावर टीका करत आहेत तुम्ही गडावर कधी गेला आहात का किल्यांसाठी निधी दिला आहे का?, असा थेट सवाल संभाजीराजे यांनी केला आहे.

राज्यातील सर्व लोकांना कल्पना आहे की गडांवर मी काम करत आहे. गेल्या काही दिवसांपासून अनेकांची मागणी होती की मी विशाळगडावर काम करावं. दीड वर्षपूर्वी आम्ही गडाला भेट दिली होती. गलिच्छ प्रमाणे तिथं अतिक्रमण झालं होतं. तिथल्या स्थानिक लोकांनी देखील मान्य केलं होतं की अतिक्रमण झालं आहे. गडावर १५८ अतिक्रमणं झाली होती. तत्कालीन जिल्हा अधिकर्यांनी सांगितलं होतं की अतिक्रमण हटवा. पण राजकीय लोकांनी हस्तक्षेप केला आणि स्टे आला होता. लोकप्रतिनिधींनी दबाव टाकला होता, असं संभाजीराजे म्हणाले.

विशाळगडावर धर्मचा नाही तर अतिक्रमणचा विषय होता. या गडाचा इतिहास मोठा आहे. एक राजधानी देखील होती. तिथं कत्तलखाना आणि अनेक नको ती दुकाने होती. अतिशय गलिच्छ अतिक्रमण झालं होतं. पार्ट्या होत होत्या. म्हणून मी आक्रमक झालो होतो. मी आधी सांगितलं होतं की काम करा नाहीतर गडावर जाईल म्हणून मी आक्रमक झाला होतो. पालकमंत्री, तत्कालीन गृहराज्यमंत्री सतेज पाटील काही बोलले नाहीत. मग मी आक्रमक झालो यात काय चूक आहे?, असा सवालही संभाजीराजेंनी केला आहे. आता माझ्यावर जातीवादाचे आरोप केले जात आहेत. अतिक्रमण हटवलं, याचा मला आनंद आहे. हे आधीच व्हायला पाहिजे होतं. आता सगळे अतिक्रमण हटवत आहेत. काल एका दिवशी ७० अतिक्रमण हटवले आहेत. मुख्यमंत्री आणि शिव भक्तचे आभार व्यक्त करतो, असंही यावेळी संभाजीराजेंनी म्हटलं.

# सेंटर ऑफ एक्सलन्स इन रोबोटिक्स अॅण्ड ऑटोमेशनचे मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते उद्घाटन

### शासकीय संस्थांमधून दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देण्याचा शासनाचा प्रयत्न-चंद्रकांतदादा पाटील

पुणे । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ आणि शासकीय तंत्रनिकेतन पुणेच्या संयुक्त विद्यमाने उभारण्यात आलेल्या सेंटर ऑफ एक्सलन्स इन रोबोटिक्स ण्ड ऑटोमेशनचे उद्घाटन राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. जागतिक स्तरावर मागणी येईल असे कुशल मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी शासकीय तंत्रनिकेतनच्या माध्यमातून उत्तम दर्जाचे शिक्षण आणि प्रशिक्षण उपलब्ध करून देण्याचा शासनाचा प्रयत्न असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

शासकीय तंत्रनिकेतन येथे आयोजित या कार्यक्रमाला आमदार सिद्धार्थ शिरोळे, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचे संचालक डॉ.प्रमोद नाईक, विभागीय सहसंचालक डॉ.दत्तात्रय जाधव, सचिव डॉ. महेंद्र चितलांगे, प्राचार्य डॉ.राजेंद्र पाटील आदी उपस्थित होते.

मंत्री श्री.पाटील म्हणाले, उत्तमता वाढविल्याशिवाय देशातील मनुष्यबळ आणि उत्पादनाला जागतिक पातळीवर मागणी वाढणार नाही. त्यादृष्टीने शासकीय तंत्रनिकेतनच्या माध्यमातून उत्तम दर्जाचे शिक्षण आणि प्रशिक्षण विद्यार्थ्यांना उपलब्ध करून द्यावे. शासकीय संस्थांनी उद्योगांसोबत सहकार्य वाढवून विद्यार्थ्यांना सुविधा उपलब्ध





करून द्याव्यात. केंद्र सरकारही शासकीय तंत्रशिक्षण क्षेत्राच्या विकासासाठी निधी देण्यास तयार आहे. त्यामुळे शासकीय तंत्रनिकेतन संस्थांनी नव्या कल्पना समोर आणाव्यात, त्यानुसार उत्तम सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सर्व सहकार्य करण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.


शासकीय तंत्रनिकेतन अधिक समृद्ध आणि परिपूर्ण करण्यावर शासनाचा भर आहे. जगभरात आज कुशल मनुष्यबळ आवश्यक असताना अशा संस्था उत्तमरीतीने चालविणे, तेथे सुविधा देणे गरजेचे आहे. म्हणून शासनाने अशी राज्यात तीन उत्कृष्टता केंद्र मंजूर केली असून त्यातील पहिले पुण्यात सुरू होत आहे. ४१ तंत्रनिकेतनमध्ये १ हजार ६०० विद्यार्थ्यांसाठी सीईटीची क्षमता वाढवून त्यासाठी संगणक प्रयोगशाळा उभारण्यात आल्या आहेत.मुलींच्या शिक्षणाला शासन प्रोत्साहन देत असून त्यांना मोफत शिक्षणाची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. शासकीय तंत्रनिकेतन संस्थेत मुलींचे वसतिगृह उभारण्याचा प्रस्ताव दिल्यास त्यासाठी सहकार्य करण्यात येईल, असेही श्री. पाटील म्हणाले. आमदार शिरोळे म्हणाले, शासकीय तंत्रनिकेतन इमारतीला ऐतिहासिक महत्त्व असून अशा इमारतीत पहिले उत्कृष्टता केंद्र स्थापित होण्याला वेगळे महत्व आहे. तंत्रनिकेतमध्ये अनुभवाधारीत शिक्षण मिळत असल्याने अत्याधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध होणे महत्त्वाचे असते. शासकीय तंत्रनिकेतन संस्थेत अशा सुविधा असल्याने जागतिक पातळीवर यश मिळविणारे विद्यार्थी संस्थेतून घडावेत, अशा शुभेच्छा त्यांनी दिल्या.तंत्रशिक्षण मंडळाचे संचालक डॉ.नाईक म्हणाले, तंत्रनिकेतनच्या विद्यार्थ्यांसाठी उभारण्यात आलेले आणि उद्योगाचे आधुनिक तंत्रज्ञान असलेले अशा स्वरूपाचे हे पहिलेच उत्कृष्टता केंद्र आहे. उद्योगातील रोबोटिक्स तंत्रज्ञान विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी उपलब्ध झाल्याने रोजगार मिळवून देण्यासाठी आणि उद्योगांना कुशल मनुष्यबळ मिळवून देण्यासाठी हे केंद्र उपयुक्त ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.प्राचार्य डॉ.पाटील यांनी प्रास्ताविकात सेंटर ऑफ एक्सलन्स इन रोबोटिक्स ण्ड ऑटोमेशन आणि शासकीय तंत्रनिकेतन विषयी माहिती दिली. यावेळी मंत्री श्री.पाटील यांच्या हस्ते बहुउद्देशीय संगणक प्रयोगशाळेचेही उद्घाटन करण्यात आले.

# वारीत सहभागी झालेल्या कमल बोरकरांचे निधन

पुणे : संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यातील वारकरी महिला कमल सोपानराव बोरकर (वय ६५) यांचे सोमवारी (ता.१५) अकलुज जवळील तोंडले-बोंडले गावी ह्रदयविकाराने निधन झाले. त्यांच्यामागे पती, मुलगा, मुलगी व सून नातवंडे असा परिवार आहे.

मूळचे नारायणपूरचे असलेले बोरकर यांचे कुटुंब नोकरीनिमित्त हडपसर, पंधरानंबर येथे राहत आहे. त्या पालखी सोहळ्यातील सत्संग दिंडी क्रमांक २२ मधून पायी वारीत सहभागी झाल्या होत्या. गेली पंधरा वर्षांपासून त्या पायी वारी करीत आहेत.

येथील श्री गुरूदत्त भजनी मंडळाच्या त्या अध्यक्षा होत्या. विविध धार्मिक कार्यक्रमात त्यांचे



भजनीमंडळ भजनसेवा देत आहे. दरवर्षी हडपसर येथील पालखी विसावास्थळी त्यांची भजनसेवा असते. याही वर्षी येथे भजनसेवा देवून त्या दींडीसोहळ्यात सहभागी झाल्या होत्या. एकादशीला दोन दिवस बाकी असतानाच त्यांचे निधन झाल्याने त्यांचे कुटुंब व सहकारी वारकऱ्यांनी हळहळ व्यक्त केली. हडपसर परिसरातील त्यांच्या सहकाऱ्यांनीही हळहळ व्यक्त केली. प्रशांत बोरकर हे त्यांचे पुत्र होत.